अर्धमागधी प्रवेश

इयत्ता आठवी



शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक : पापुमं/१०९५/१६७६४/८-भा/अर्धमागधी/
स (पु), दिनांक २.१.९६

अर्धमागधी प्रवेश

(संपूर्ण अभ्यासक्रम)

इयत्ता आठवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

प्रथमावृत्ती : १९९६
पुनर्मुद्रण : २००९

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे -४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

संपादक मंडळ	:	डॉ.दे.खं.खरवंडीकर प्रा.मा.श्री.रणदिवे डॉ.सौ. नलिनी प्र. जोशी सौ.राजश्री रा.मोहाडीकर
संयोजक	:	श्री. स्वामीनाथ सिंह
चित्रकार	:	श्री. चंद्रशेखर बेगमपुरे
मुखपृष्ठ	:	श्री. दीपक संकपाळ
निर्मिती	:	श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी श्री. संजय कांबळे, निर्मिती अधिकारी श्री. संदीप आजगांवकर, निर्मिती सहायक
फोटोसेटिंग	:	संगणक विभाग, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे.
कागद	:	७० जी.एस.एम., क्रिमव्होव
प्रकाशक	:	श्री विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-४०००२५
मुद्रक	:	विजय प्रिन्टींग प्रेस मुंबई - ४०० ०१३
मुद्रणादेश क्रमांक	:	N/TECH - 2009-10/**1000**



पइण्णा

भारहो मम देसो अत्थि।
सव्वे भारहवासिणो मज्झ बंधुणो संति।
मज्झ देसम्मि मम पेम्ममत्थि।
मज्झ देसंसि विज्जमाणाणं
समिद्धाणं विविहयाए विभूसियाणं च
परंपराणं मे अहिमाणो अत्थि।
तासिं परंपराणं रक्खगो होउं समत्थो होज्ज
त्ति अहं निच्चं पयत्तं करिस्सामि।
अहं मज्झ पालगाणं गुरुयणाणं जेट्ठगाणं च
सम्माणं काहिमि, पच्चेगेण सद्धिं
सुयणत्तणेण य आयरिस्सामि।
मम देसे मज्झ देस-बंधवेसुं च
मह निट्ठा होज्ज त्ति हं पइण्णं करेमि।
तेसिं कल्लाणे समिद्धीए य
मज्झ सोक्खं समाविट्ठं भवइ।

प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या भाषा-विषयक पुनर्रचित नवीन अभ्यासक्रमास अनुसरून विविध भाषांची पाठ्यपुस्तके तयार करण्याचा एक मोठा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी हाती घेतला. त्यानुसार अर्धमागधी (प्राकृत) या ऐच्छिक भाषाविषयासाठी अर्धमागधी-प्रवेश (संपूर्ण) हे पुस्तक आठव्या इयत्तेसाठी तयार करण्यात आले आहे.

अर्धमागधी, माहाराष्ट्री, शौरसेनी, अपभ्रंश इ. प्राकृत भाषा मध्ययुगीन भारतीय भाषा असून त्यात विपुल साहित्य लिहिले गेले आहे. मध्ययुगीन भारताचा इतिहास व संस्कृती यांचे दर्शन घडवण्याच्या दृष्टीने हे साहित्य मोलाचे आहे. अर्धमागधी आगम ग्रंथ, त्यावरील टीका, सुभाषितसंग्रह, काव्य व लोककथा इत्यादींमधून आवश्यक ते फेरफार करून पाठ तयार केले आहेत.

महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ यांच्याकडून पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. त्यांच्याकडून आलेले अभिप्राय व सूचना यांचा सांगोपांग विचार करून पुस्तकाला अंतिम रूप देण्यात आले आहे.

मंडळाचे अर्धमागधी-संपादक मंडळ व चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. या सर्वांचे मंडळ मन:पूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, पालक व शिक्षक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा वाटते.

(डॉ. वसंत काळपांडे)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

पुणे
दिनांक : २० मार्च १९९६
चैत्र शुद्ध प्रतिपदा, शके १९१८

पुस्तकात वापरलेली लेखन पद्धती

अर्धमागधी किंवा प्राकृत हा शब्द व्यापक दृष्टीने वापरला जातो व त्यामध्ये माहाराष्ट्री, जैन माहाराष्ट्री, शौरसेनी, अपभ्रंश इत्यादी प्राकृत भाषांचा समावेश केला जातो. त्याचप्रमाणे या भाषेच्या व्याकरणाचे नियमही लवचिक आहेत. त्यामुळे एकाच ग्रंथाच्या निरनिराळ्या छापील आवृत्त्यांमध्येही एकाच प्रकारची लेखनपद्धती स्वीकारलेली दिसत नाही. परंतु या पुस्तकात अर्धमागधी (प्राकृत) उतारे लिहिताना सुसंगती व एकरूपता आणण्यासाठी एक ठराविक लेखनपद्धती वापरलेली आहे. तिची वैशिष्ट्ये अशी -

१. आद्य 'न' चा 'ण' असा बदल केला नाही. (उदा. नदी-नई)

२. मध्य 'न' चा 'ण' असा बदल केला आहे. (उदा. गमन-गमण)

३. जर मूळच्या संस्कृत जोडाक्षरात 'न' असेल तर त्याचा तद्भव करताना बदल केला नाही.

(उदा. कन्या-कन्ना) मात्र मुळात 'ण' असेल तर तद्भवात 'ण' च ठेवला आहे. (उदा. कर्ण-कण्ण)

४. 'ज्ञ' चा सामान्यत: 'ण्ण' असा बदल केला आहे. (उदा. संज्ञा-सण्णा)

५. 'ति, त्ति, चिय, च्चिय, च्चेव, च्चेय, इव, इय, वा, पि, पिव, विय' इ. अव्यये मागील शब्दाला न जोडता स्वतंत्र लिहिली आहेत.

६. अनुस्वारानंतर 'च' व इतरत्र 'य' असे लिहिले आहे.

७. अनुस्वारानंतर 'पि' व इतरत्र 'वि' असे लिहिले आहे.

८. अनुस्वारानंतर 'ति' व इतरत्र 'त्ति' असे लिहिले आहे. अवतरण चिन्ह वापरले नसल्यास 'त्ति' पूर्वीचा दीर्घ स्वर ऱ्हस्व केला आहे. (उदा. दाहि त्ति)

९. 'अ', 'इ' आणि 'उ'कारान्त पुंलिंगी आणि नपुंसकलिंगी नामांच्या सप्तमी एकवचनाचे रूप लिहिताना 'म्मि' हा प्रत्यय जोडला आहे. मागील वर्णावर अनुस्वार देऊन पुढे 'मि' असे लिहिले नाही.

१०. अनुनासिकाचा उपयोग न करता फक्त अनुस्वाराचा उपयोग केला आहे व तो अनुस्वार पूर्ववर्णावर दिलेला आहे.

११. 'य श्रुति' चा वापर केला आहे.

१२. पद्य उताऱ्यात वृत्ताकरिता ऱ्हस्व व दीर्घ असे बदल केलेले आहेत.

१३. अर्थ सुलभतेसाठी आवश्यक तेथे सामासिक शब्दातील पदे, मध्ये संयोगचिन्हांचा उपयोग करून लिहिली आहेत. याच कारणासाठी काही ठिकाणी संधी न करता पदे स्वतंत्रपणे लिहिली आहेत.

१४. अर्थसुलभतेसाठी विरामचिन्हे व अवतरणचिन्हे वापरली आहेत.

१५. प्राकृत व्याकरणाचे नियम बरेच लवचिक असल्यामुळे एकाच संस्कृत शब्दाचे अनेक तद्भव होऊ शकतात. उदा. उदक-उयय, उदग, उयग; जलचर-जलयर, जलचर; दैव-देव्व, दइव्व; पुण्यप्रभाव-पुण्णप्पभाव, पुण्णपहाव, पुण्णप्पहाव इ. संहितेमध्ये याबाबतीत सर्वत्र एकच रूप न वापरता विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढावी म्हणून एकाच संस्कृत शब्दाचे उपलब्ध असलेले अनेक तद्भव शब्द वापरले आहेत.

१६. प्राकृत व्याकरणात विभक्ती, काळ, अर्थ, धातुसाधिते इंत्यादींची अनेक वैकल्पिक रूपे आढळतात. ही विविधता संहितेत वापरलेल्या रूपांमध्येही ठेवली आहे. त्यात एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला नाही.

१७. शब्दार्थ देताना कंसामध्ये संस्कृत प्रतिशब्द दिला आहे. जर असा प्रतिशब्द उपलब्ध नसेल तर त्या शब्दाला देशी किंवा देश्य (कंसामध्ये दे.) असे लिहिले आहे.

पुस्तकात दिलेल्या संक्षेपांचा खुलासा

अ. अव्यय

अ.व. अनेकवचन

आ. आज्ञार्थ

ए.व. एकवचन

कर्त.धा.वि. कर्तरी धातुसाधित विशेषण

क.भू.धा.वि. कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषण

क्रि. क्रियापद

क्रि.वि. क्रियाविशेषण

तृ.पु. तृतीय पुरुष

दे. देशी

द्वि.पु. द्वितीय पुरुष

नपुं. नपुंसकलिंग

पुं. पुंलिंग

पू.का.धा.अ. पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय

पं. पंचमी

प्र. प्रथमा

प्र.पु. प्रथमपुरुष

भ.का. भविष्यकाळ

भू.का. भूतकाळ

म. मराठी

व.का. वर्तमानकाळ

वि. विशेषण

विध्य. विध्यर्थ

विध्य.क.धा.वि. विध्यर्थी कर्मणी धातुसाधित विशेषण

व्या.वि. व्याकरणविवेचन

सर्व. सर्वनाम

स. सप्तमी

संबो. संबोधन

स्त्री. स्त्रीलिंग

हिं. हिंदी

हे.धा.अ. हेत्वर्थक धातुसाधित अव्यय

अनुक्रमणिका

गज्ज-विभाओ

पाठानुक्रम	शीर्षक	पृष्ठ
१.	**उज्जाणविहारो** व्याकरणविवेचन-१ (प्रास्ताविक, वर्णमाला)	१
२.	**को किं करेइ** व्याकरणविवेचन-२ (वर्णपरिवर्तन)	७
३.	**केण किं कीरइ** व्याकरणविवेचन-३ (नामे, विशेषणे)	१५
४.	**कम्हा किं** व्याकरणविवेचन-४ (क्रियापदे-वर्तमानकाळ)	२१
५.	**कस्स केण संबंधो** व्याकरण विवेचन-५ (नामे, विशेषणे)	२५
६.	**कम्मि किं** व्याकरणविवेचन-६ (सर्वनामे)	३०
७.	**रुक्खा सप्पुरिसा विय**	३४
८.	**अवि तुमं जाणसि**	३६
९.	**भगवं महावीरो**	३८
१०.	**भावत्थं चिंतए निच्चं** व्याकरणविवेचन-७ (क्रियापदे-भूतकाळ, आज्ञार्थ)	४०
११.	**धणेसर-कहाणयं** व्याकरणविवेचन-८ (संधिनियम)	४६
१२.	**गयाणुगइओ लोगो** व्याकरणविवेचन-९ (धातुसाधिते)	५२
१३.	**उज्जमसीलो किसीवलो**	५९
१४.	**चउ-जामायराणं कहा**	६२

पज्ज-विभाओ

पाठानुक्रम	शीर्षक	पृष्ठ
१.	सुहासियाइं (पाठांतरासाठी)	६६
२.	अरिट्ठणेमिणो निक्खमणं	७०
३.	सिसुवालकहा	७३
४.	सुहासियाइं	७६
	परिशिष्ट - १ (अ) विभक्ति-प्रत्यय	८०
	- १ (ब) धातूंना लागणारे प्रत्यय	८१
	परिशिष्ट - २ विशिष्ट विभक्तींचा उपयोग	८२
	परिशिष्ट - ३ देशी शब्दांचा संग्रह	८४

गज्ज-विभाओ

१. पढमो पाढो
उज्जाण-विहारो

अरविंदो : नीले, तुमं कत्थ गच्छसि ?

नीला : अरविंद, अहं गेह-समीवं उज्जाणे गच्छामि ।

अरविंदो : नीले, को अयं रुक्खो ?

नीला : अरविंद, अयं अंब-रुक्खो ।

अरविंदो : अम्हाणं जणओ अंब-रुक्खस्स हेट्ठा पोत्थगं पढइ ।

नीला : अम्हाणं जणणी वि अंब-रुक्खस्स छायाए चिट्ठइ, घर-कम्मं च करेइ ।

अरविंदो : पियामहो पियामही वि अंब-रुक्खस्स हेट्ठा वीसामं करेंति ।

नीला : अज्ज पहाए एव अम्हाणं माउलो मामी य एंति । ते पियामहं पियामहिं च पणमंति ।

अरविंदो : एसो अंब-रुक्खो अईव मणोहरो । अस्स छाया सीयला ।

नीला : अंब-रुक्खस्स साहाए दोला वट्टइ ।
अम्हाणं सहीओ दोलाए आंदोलेंति ।

अरविंदो : सुंदरो एसो महु-मासो । मंजरियाणं सुगंधेण वाउ-मंडलं परिपूरियं । कोइलाणं महुर-गीएहिं अम्हाणं सव्वे कुडुंबिय-जणा आणंदिया होंति ।

नीला : अहुणा अणज्झाओ वट्टइ । अओ अम्हे पाढसालं न गच्छामो ।
पिक्काइं अंब-फलाइं खायामो । अंगणे खेलामो ।

अरविंदो : कूव-समीवस्स जंबु-रुक्खस्स फलाइं भक्खामो । कूवस्स जले उब्बोलण-निब्बोलणं करेमो ।

नीला : अरविंद, जणओ अम्हे हक्कारेइ ।

अरविंदो : बाढं ! तुरियं तुरियं गच्छामो ।



सर्वनामे - अहं (मी), अम्हे (आम्ही), तुमं (तू), तुम्हे (तुम्ही), सो (तो), सा (ती), ते (ते), अयं (हे), अस्स (ह्याचा), को (कोणता)

नामे (पुं., स्त्री., नपुं.) - उज्जाणं, अंब-रुक्खो, छाया, पियामहो, पियामही, माउलो, मामी, महुमासो, अणज्झाओ, जंबू, कूवो, पाढसाला, अंगणं

विशेषणे - मणोहर, सीयला, महुर

क्रियापदे - गच्छ, पढ, कर, पणम, आगच्छ, भक्ख, वट्ट, खा, खेल, हक्कार

शब्दार्थ

कत्थ - कोठे ?

गेह-समीवं - घराजवळ

को - सर्व. कोणता ?

अंब-रुक्ख (आम्रवृक्ष) पुं. आंब्याचे झाड

हेट्ठा (दे.) अ. खाली

पहाय (प्रभात) नपुं.सकाळ

पणम (प्रणम्) क्रि.प्रणाम करणे

दोला-स्त्री.झोपाळा

महुमास (मधुमास) पुं.वसंत ऋतू

परिपूरिय वि.परिपूर्ण, भरलेले

कुडुंबिय (कौटुम्बिक) वि.कुटुंबातील

पाढसाला (पाठशाला) स्त्री.शाळा

कूव (कूप) पुं.विहीर

उब्बोलण-निब्बोलण- (दे.) डुबक्या

बाढं - अ. ठीक आहे

गच्छ - क्रि. जाणे

उज्जाण (उद्यान) नपुं. बाग

अयं-सर्व. हा

जणय (जनक) पुं. पिता, वडील

पियामह-पियामही - आजोबा, आजी

वीसाम (विश्राम) पुं.विश्रांती

माउलो-मामी - मामा-मामी

सीयल (शीतल) वि.थंडगार

सही (सखी) स्त्री.मैत्रीण

वाउमंडल (वायुमंडल) नपुं. वातावरण

कोइला (कोकिला) स्त्री.कोकिळा

अणज्झाय (अनध्याय) पुं.सुट्टी

पिक्क (पक्व) वि.पिकलेले

भक्ख (भक्ष्) क्रि.खाणे

हक्कार (दे.) क्रि.बोलावणे

तुरियं-क्रि.वि.-त्वरित, लगेच

चिट्ठ-क्रि. बसणे

अभ्यास

१. **प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) या पाठात कोण-कोण एकमेकात संवाद करत आहेत ?

(२) आई-वडील व आजी-आजोबा आंब्याच्या झाडाखाली काय करत आहेत ?

(३) अरविंद बागेतील वातावरणाचे वर्णन कोणत्या शब्दात करतो ?

(४) नीला व अरविंद सुट्टीचे काय-काय बेत करत आहेत ?

२. **या पाठातील अकारान्त, आकारान्त व इकारान्त नामे लिहा.**

३. **या पाठातील क्रियापदांचे अर्थ लिहा. पुस्तकातील व्याकरणविवेचनाच्या आधारे सर्व क्रियापदांची वर्तमानकाळातील रूपे लिहा.**

व्याकरण-विवेचन - (१)

प्रास्ताविक

१. मराठी भाषेत आपण चाक, ताक, काम, तण, आग या सारखे शब्द वापरतो. यांच्याशी जवळीक साधणारे संस्कृत शब्द अनुक्रमे चक्र, तक्र, कर्मन्, तृण, अग्नि, हेही आपल्या चांगल्या परिचयाचे आहेत. या दोन्ही गटांतील शब्दांचा एकमेकांशी संबंध असल्यासारखे वाटते. वरील दोन्ही गटांतील शब्दांना सांधणारा एखादा दुवा असला पाहिजे असे लक्षात येते. या दोहोंना सांधणाऱ्या भाषेलाच प्राकृत भाषा असा सामान्य शब्द वापरला जातो. वर सांगितलेल्या संस्कृत शब्दांची प्राकृत रूपे - चक्क, तक्क, कम्म, तण, अग्गि अशी होतात.

२. प्राकृत ही एकच भाषा नसून तिच्यात अर्धमागधी, माहाराष्ट्री, जैन माहाराष्ट्री, शौरसेनी, पैशाची, अपभ्रंश इ. स्थलकालपरत्वे प्रचारात आलेल्या भाषांचा समावेश होतो. प्राकृत या शब्दाचे स्पष्टीकरण दोन प्रकारे करण्यात येते. (१) प्रकृति म्हणजे मूळ (भाषा), अर्थात् संस्कृत. तेव्हा प्राकृत म्हणजे संस्कृतोद्भव भाषा. (२) प्राकृत म्हणजे मुळात असलेल्या भाषा; त्यांच्यावर संस्कार होऊन झालेली ती संस्कृत भाषा.

या प्राकृत भाषांपैकी अर्धमागधीला इतिहासात विशिष्ट स्थान आहे. पालि ही जशी बौद्ध धर्मग्रंथांची भाषा आहे, तशी अर्धमागधी ही जैनांच्या धर्मग्रंथांची भाषा आहे. भगवान महावीरांनी आपला धर्मोपदेश या भाषेतून केला. अर्धमागधी या नावाचे स्पष्टीकरण दोन प्रकारांनी करण्यात येते. (१) मागधी भाषेची अर्धी (म्हणजे काही) वैशिष्ट्ये असणारी भाषा, (२) मगध म्हणजे स्थूलमानाने सध्याचे बिहार राज्य. या मगध राज्याच्या अर्ध्या भागात प्रचलित असणारी भाषा. अर्धमागधीलाच जैन आचार्य हेमचंद्र यांनी आर्ष म्हणजे ऋषिप्रणीत भाषा असे संबोधले आहे.

३. वस्तुतः संस्कृत आणि प्राकृत यात मूलभूत फरक नाही. सध्याच्या मराठीत जसा नागर मराठी व ग्रामीण मराठी असा भेद दाखवता येईल, तसाच काहीसा प्रकार संस्कृत व प्राकृत यांच्यातील संबंधाबाबत आहे. संस्कृत ही सुशिक्षितांची भाषा आहे असे म्हटल्यास प्राकृत भाषांना ग्रामीण भाषा असे स्थूलमानाने म्हणता येईल. भाषा या स्थल, काल आणि त्यांच्यावर होणारे संस्कार या कारणांमुळे बदलत असतात. संस्कृतचा जसा प्राकृत भाषांवर प्रभाव पडलेला दिसतो, तसाच प्राकृत भाषांचाही संस्कृत

भाषेवर परिणाम झाल्याचे आढळते. आधुनिक भारतीय भाषांचा संस्कृतशी असलेला संबंध सर्वज्ञात व सर्वसंमत आहे. म्हणून प्राकृतभाषांच्या अभ्यासाशिवाय आधुनिक भाषांची जडणघडण समजणार नाही.

४. अर्धमागधीमधील शब्दसंपत्ती बहुतांशी संस्कृतप्रमाणेच आहे. या शब्दांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करण्यात येते. (१) **तत्सम शब्द** - ('त्या' समान म्हणजे संस्कृतप्रमाणे असणारे शब्द) उदा.- कमल, परम, वीर, तीर, तरु, सार, संसार, फल, इ. (२) **तद्भव शब्द** - ('त्या'-पासून निर्माण झालेले म्हणजे संस्कृतपासून, त्यात काही नियमानुसार बदल होऊन निर्माण झालेले शब्द) उदा.- पूर्वी सांगितलेले चक्क, तक्क, कम्म, तण, अग्गि हे शब्द तद्भव आहेत. (३) या शिवाय आणखी एका वेगळ्या प्रकारचे शब्द प्राकृत भाषांमध्ये आहेत. त्यांना **'देशी शब्द'** असे नाव आहे. यांचे मूळ संस्कृतात सापडत नाही किंवा काहींचे मूळ सहजासहजी संस्कृत शब्दांशी नेऊन भिडविता येत नाही. उदा.- गोस (सकाळ), चंग (चांगला), डाला (फांदी), बप्प (बाप), कोड्ड (कौतुक). या देशी शब्दांचे वैशिष्ट्य असे की त्यांपैकी कित्येक तसेच्या तसे किंवा परिवर्तित स्वरूपात आधुनिक भारतीय भाषांत आढळतात.

५. **प्राकृत साहित्य** - श्वेतांबर जैनांचे ४५ धर्मग्रंथ अर्धमागधी भाषेत आहेत. अन्य प्राकृत भाषांतूनही विपुल प्रमाणात साहित्य निर्माण झालेले आहे. त्यात पउमचरिय, सेतुबंध या सारखी महाकाव्ये, कर्पूरमंजरी, चंदलेहा यासारखे नाट्यवाङ्मय, कुवलयमालासारखे कथावाङ्मय, गाहासत्तसई, वज्जालग्ग या सारखे मुक्तक काव्यांचे संग्रह यांचा उल्लेख करता येईल. प्राकृत भाषांची व्याकरणे व शब्दकोशही रचण्यात आलेले आहेत.

६. **वर्णमाला** -

स्वर - (स्वतंत्रपणे उच्चारता येण्याजोगा वर्ण म्हणजे स्वर)

ऱ्हस्व स्वर - अ इ उ एॅ ओॅ

दीर्घ स्वर - आ ई ऊ ए ओ

टीप - (१) संस्कृत वर्णमालेतील **ऋ, ॠ, लृ, ऐ, औ** हे स्वर अर्धमागधीत नाहीत.

(२) संस्कृतमध्ये **ए** आणि **ओ** हे स्वर नित्य दीर्घ आहेत. अर्धमागधीत, विशेषत: पद्यात वृत्ताच्या सोयीसाठी **ए** आणि **ओ** हे स्वर ऱ्हस्व होऊ शकतात. ऱ्हस्व **ए** आणि **ओ** हे स्वर **एॅ** आणि **ओॅ** असे लिहिण्याची पद्धत आहे.

व्यंजने - (स्वरांच्या मदतीने उच्चारता येण्याजोगा वर्ण म्हणजे व्यंजन)

नाव	स्थान	व्यंजने				
क-वर्ग	(कंठ)	क	ख	ग	घ	ङ
च-वर्ग	(तालु)	च	छ	ज	झ	ञ
ट-वर्ग	(मूर्धा)	ट	ठ	ड	ढ	ण
त-वर्ग	(दंत)	त	थ	द	ध	न
प-वर्ग	(ओष्ठ)	प	फ	ब	भ	म
अन्त:स्थवर्ण		य	र	ल	व	
ऊष्मवर्ण		स	ह	(ह या व्यंजनास महाप्राण असेही म्हणतात)		
अनुस्वार	ं					

टीप - (१) संस्कृतमधील **श** आणि **ष** ही व्यंजने अर्धमागधीत नाहीत. त्यांच्या ऐवजी **स** या व्यंजनाचा उपयोग केला जातो.

(२) संस्कृमधील **ङ** आणि **ञ** या व्यंजनांचा अर्धमागधीत प्राय: उपयोग केला जात नाही.

(३) संस्कृतमधील विसर्ग अर्धमागधीत नाही.

(४) अनुनासिकापुढे व्यंजन आल्यास त्याचा अनुस्वार करण्याची प्रथा आहे. उदा. **वंक, संख, अंजलि, कंप, पयंड.**

(५) मराठी वर्णमालेतील **ळ, क्ष, ज्ञ** ही व्यंजने अर्धमागधीत नाहीत.

अभ्यास

१. **पुढे दिलेल्या शब्दांचे तत्सम आणि तद्‌भव असे वर्गीकरण करा.**
विहग, घड, सोहा, नर, मल, माला, धम्म, वसु

२. **पुढील अर्धमागधी शब्दांचे अर्थ सांगा -**
मुह, नयण, पसु, अग्गि, पत्थर, रिण, दुद्ध, नमोक्कार.

३. **अर्धमागधीतील शब्दांचे तीन प्रकार सांगून प्रत्येकाचे एक एक उदाहरण द्या.**

२. बीओ पाढो
को किं करेइ

१

अयं सिवालओ ।
सिवालयस्स परिसरो रमणिज्जो ।
सव्वे जणा **सिवालयं** गच्छंति **सिवं** पणमंति य ।
अरविंदो मिलिंदो य **उज्जाणं** गच्छंति ।
ते **विविहाइं पुप्फ-फलाइं** आणेंति ।
माहवी, नेहा य **धवल-कमलाइं** आणेंति, **सिवं** च अप्पेंति ।
सिव-रत्तीए महूसवे सव्वे जणा मिलिऊण **देउलं** विहूसेंति, **सिलोगे** य गायंति ।

२

अहं **पोत्थगं** पढामि ।
छत्तो **अज्झयणं** करेइ ।
निवो **गामं** रक्खइ ।
सेवगो **सामिं** सेवइ ।
सीहो **तिणं** न भक्खइ ।
मिया रण्णे **तिणं** भुंजंति, नईए **सीयलं जलं** च पिबंति ।
साहू **तवं** तवेइ, जणाणं **धम्मं** उवएसइ, सव्वाणं **मंगलं** च इच्छइ ।
मेहा **जलं** वरिसंति ।
अग्गी **वणं** डहइ ।
कई **दुज्जणं** निंदइ ।
बुहा **नाणं** इच्छंति ।
जहा हुयवहो **कट्ठं** डहइ, तहा महा-पुरिसा **रागद्दोसाइं** विणासेंति ।
सव्वे जणा **सुहं** इच्छंति न **दुक्खं** ।
अम्हे **सच्चं** वयामो ।

३

जणणी **सोहणं कहाणगं** कहेइ ।

सज्जणो **खमा-सत्थं** एव पउंजइ ।

मुणी **आभरणाइं** चयइ ।

सूरिओ सव्वत्थ **पगासं** पसारेइ ।

चंद-किरणा सययं **अमयं** वरिसंति ।

भमरो **पुप्फ-रसं** आसाएइ ।
रुक्खा जहिच्छं **पुप्फ-फलाइं** देंति ।
महु-मक्खिया **महु-कोसं** करेंति ।
गहवई **भिक्खुं** निमंतेइ ।
बालो मोरस्स **चित्तं** पासइ ।
तुमं **पासायं** पविससि ।
अम्हे **मोयगे** भक्खामो ।
नासिया गंधस्स **गहणं** करेइ, जीहा **रसं** आसाएइ ।
अम्हे कण्णेहि **गीयं** सुणामो ।

४

मालायारो **मालं** गुंफेइ ।
तेल्लिओ **तेल्लं** विक्किणइ ।
कुंभयारो **घडे** करेइ ।
सूइयारो **वत्थाइं** सिव्वइ ।
सुवण्णयारो **कुंडलं** घडेइ ।
चम्मयारो **उवाहणं** करेइ ।
वेज्जो **ओसहं** देइ ।
चित्तयारो गणेसस्स **चित्तं** चित्तेइ ।
गायओ मंद-सरेण **महुरं** **गीयं** गाइ ।
वणिओ आवणे **ववहारं** करेइ ।
सिप्पी **देव-पडिमं** घडेइ ।
किसीवलो **खेत्तं** करिसइ ।
कट्ठहारा वणाओ **कट्ठाइं** आणेंति ।
आहीरी **दुद्धं** दुहइ ।
घरिणी **दहिं** महइ ।
आयरिओ संघस्स **भारं** वहइ ।

टीप - कर्तरी वाक्यात कर्म नेहमी द्वितीयेत वापरतात. पाठातील ठळक शब्द द्वितीया विभक्तीत आहेत. कर्ता जी गोष्ट क्रियेने साधतो त्यास कर्म म्हणतात. तसेच सामान्यत: जेथे जावयाचे त्याचीही द्वितीया केली जाते. या पाठात विविध प्रकारचे कर्ते, कर्मे व क्रियापदे योजून द्वितीया विभक्तीचा विस्तृत परिचय करून दिला आहे.

शब्दार्थ

सिवालय (शिवालय) पुं. शिवमंदिर
मिय (मृग) पुं. हरीण किंवा कोणताही पशू
सिलोग (श्लोक) पुं. श्लोक, स्तुती
अप्प (अर्पय) क्रि. अर्पण करणे
हुयवह (हुतवह) पुं. अग्नी
अमय (अमृत) नपुं. अमृत
आसाय (आस्वादय) क्रि. चाखणे, आस्वाद घेणे
महुकोस (मधुकोष) पुं. मधाचे पोळें
निमंत (निमन्त्रय) क्रि. निमंत्रित करणे
नासिया (नासिका) स्त्री. नाक
मालायार (मालाकार) पुं. माळी
चम्मयार (चर्मकार) पुं. चांभार
किसीवल (कृषीवल) पुं. शेतकरी
कट्ठहार (काष्ठहार) पुं. लाकूडतोड्या
ओसह (औषध) नपुं. औषध
देवपडिमा (देवप्रतिमा) स्त्री. देवाची मूर्ती
आयरिय (आचार्य) पुं. आचार्य, गुरू
भार (भार) पुं. जबाबदारी
मह (मथ्) क्रि. घुसळणे, मंथन करणे
करिस (कृष्) क्रि. नांगरणे
सिव-रत्तीए महूसवो - शिवरात्रीचा उत्सव
विहूस (विभूषय) क्रि. शृंगारणे
माहवी, नेहा (माधवी, स्नेहा) स्त्री. मुलींची नावे
नाण (ज्ञान) नपुं. ज्ञान
इच्छ (इच्छ) क्रि. इच्छा करणे
खमा-सत्थ (क्षमा-शस्त्र) नपुं. क्षमारूपी शस्त्र
महुमक्खिया (मधुमक्षिका) स्त्री. मधमाशी
जहिच्छं (यथेच्छ) क्रि.वि. इच्छेनुसार
मोर (मयूर) पुं. मोर
मोयग (मोदक) पुं. मोदक, लाडू
जीहा (जिह्वा) स्त्री. जीभ
सूइयार (सूचिकार) पुं. शिंपी
सुवण्णयार (सुवर्णकार) पुं. सोनार
सिप्पी (शिल्पिन्) पुं. मूर्तिकार, शिल्पकार
आहीरी (आभीरी) स्त्री. गवळण
घरिणी (गृहिणी) स्त्री. गृहिणी
आवण (आपण) पुं. नपुं. दुकान

अभ्यास

१. **या पाठात कोणकोणते कर्ते आले आहेत ? त्या नामांची अकारान्त, इकारान्त, उकारान्त अशी विभागणी करा.**

२. **या पाठातील द्वितीया विभक्तीत आलेल्या सर्व कर्मांचा छोटासा संग्रह करा व ती रूपे व्याकरण-विवेचन ३ मधील रूपांशी ताडून बघा.**

३. **या पाठातील सर्व क्रियापदे अर्थासह एकत्रित लिहून काढा. त्यांची वर्तमानकाळाची रूपे व्याकरण-विवेचनातील रूपांशी जुळवून पाहा.**

४. **द्वितीया विभक्तीची योग्य रूपे घालून वाक्ये पूर्ण करा -**

(१) बालो रुक्खम्मि (पत्थर) खिवइ ।

(२) अग्गी (धूम) मुंचइ ।

(३) चोरो जणाणं (धण) चोरेइ ।

(४) निवो (जुज्झ) न चयइ ।

(५) पुत्तो (जणय) सम्माणेइ ।

५. **पुढील वाक्यांचे अर्धमागधीत भाषांतर करा -**

(१) मी देवाला वंदन करते.

(२) तू गीत गातोस.

(३) तुम्ही पाठ वाचता.

(४) मिलिंद मोदक खातो.

(५) मांजर दूध पिते.

व्याकरण-विवेचन - (२)

वर्ण-परिवर्तन

१. संस्कृतमधील जे शब्द जसेच्या तसे अर्धमागधीत वापरले जातात (म्हणजेच तत्सम शब्द), ते ओळखण्याच्या बाबतीत काही अडचण येत नाही. परंतु सामान्यपणे सर्वच प्राकृत भाषांमध्ये तद्भव शब्दांचे प्रमाण खूप मोठे आहे. त्यामुळेच संस्कृतमधून अर्धमागधीत एखादा शब्द येतो तेव्हा त्यात काय बदल होतो याचा विचार करणे आवश्यक ठरते. या बदलांना वर्ण-परिवर्तन असे म्हणतात. या खेरीज राहिलेल्या देशी शब्दांचा स्वतंत्र विचार करावा लागेल.

२. **स्वर-परिवर्तन** - ऋ, ॠ, लृ, ऐ, औ हे स्वर अर्धमागधीत नाहीत. ज्या संस्कृत शब्दांत हे स्वर येतात ते शब्द अर्धमागधीत कसे बदलतात ते पाहू.

(१) **ऋ, ॠ या स्वरांचा अ, इ, उ किंवा रि असा बदल होतो.**

अ - घय (घृत), **कय** (कृत), **तण्हा** (तृष्णा)

इ - किमि (कृमि), **मिग** (मृग), **सिंगार** (शृङ्गार)

उ - **वुत्तंत** (वृतान्त), **मुसा** (मृषा), **पाउस** (प्रावृष्)

रि - **रिसि** (ऋषि), **रिण** (ऋण), **सरिस** (सदृश)

(२) **लृ या स्वराचा इलि असा बदल होतो - किलित्त** (क्लृप्त)

(३) **ऐ या स्वराचा ए किंवा अइ असा बदल होतो -**

वेर, वइर (वैर), **सेल** (शैल), **वेज्ज** (वैद्य), **वइस्स** (वैश्य), **दइव्व** (दैव)

(४) **औ या स्वराचा ओ किंवा अउ असा बदल होतो.**

कोमुई (कौमुदी), **कोसंबी** (कौशाम्बी), **ओसह** (औषध), **कउरव** (कौरव), पउर (पौर), परंतु अपवादात्मक म्हणून गौरव शब्दातील **औ** चा **आ** असाही बदल होतो - **गारव**

३. व्यंजन-परिवर्तन - व्यंजनांचे दोन प्रकार आहेत. **केवल (असंयुक्त)** व **संयुक्त.**

(१) केवल किंवा असंयुक्त व्यंजन उदा. क, ख, ग, घ, च, द इत्यादि. (येथे 'अ' स्वरयुक्त व्यंजने दिली आहेत.)

(२) मध्ये स्वर न येता लागोपाठ दोन किंवा अधिक व्यंजने आल्यास त्यास संयुक्त व्यंजन असे म्हणतात. उदा. क्र = क् + र, स्प = स् + प

४. असंयुक्त व्यंजनातील परिवर्तन - शब्दात व्यंजन हे प्रारंभी, मध्ये किंवा शेवटी येऊ शकते. उदा. **विद्युत्** या शब्दात व् हे आद्य व्यंजन आहे, द् + य हे मधले संयुक्त व्यंजन आहे, तर त् हे अंत्य व्यंजन आहे. स्थानपरत्वे येणाऱ्या या व्यंजनांचे काय काय बदल होतात ते पाहू.

(अ) (१) आद्य **'य'** चा **'ज'** असा बदल होतो. उदा. **जम** (यम), **जस** (यश), **जत्ता** (यात्रा)

(२) **'श'** आणि **'ष'** ही व्यंजने आद्य, मध्य किंवा अंत्य कोणत्याही स्थानी आली तरी त्यांचा सामान्यत: **स** असा बदल होतो. उदा. **सयल** (शकल), **उसा** (उषा), **सर** (शर), **पुरिस** (पुरुष)

(ब) अंत्य व्यंजन - अर्धमागधीत व्यंजनान्त शब्द नाहीत, म्हणजेच शब्दाच्या शेवटी व्यंजन नसते. अंत्य व्यंजनाचा लोप होतो किंवा त्यात स्वर मिळवून तो शब्द स्वरान्त केला जातो. उदा. **सिर** (शिरस्), **दाम** (दामन्), **विज्जु** (विद्युत्), **आवई** (आपद्), **आउस** (आयुस्), **पाउस** (प्रावृष्)

(क) मध्य व्यंजन - शब्दाच्या आरंभी नसलेल्या क, ग, च, ज, त, द या व्यंजनांचा लोप होतो. लोप होऊन राहिलेला स्वर 'अ' किंवा 'आ' असल्यास त्याबद्दल अनुक्रमे य किंवा या असा बदल होतो. यालाच 'य-श्रुति'चा नियम असे म्हणतात.

उदाहरणे -

(अ) **सयल** (सकल), **नयर** (नगर), **गय** (गज किंवा गत)

(ब) **वियार** (विकार किंवा विचार), **आयार** (आचार), **उयार** (उदार)

(क) **सउण** (शकुन), **पूइय** (पूजित), **पईव** (प्रदीप)

'य-श्रुति'चा नियम महत्त्वाचा आहे, कारण त्यावरून अर्धमागधीतील बऱ्याच शब्दांचा उलगडा होऊ शकतो. मात्र या नियमाला अपवादही बरेच आहेत.

उदा. **जोग** (योग), **राग**, **उदग** (उदक), **आगास** (आकाश), **लोग** (लोक), **काग** (काक), **एग** (एक) इ.

शब्दाच्या आरंभी नसलेल्या -

(१) **ख, घ, थ, ध, फ, भ या व्यंजनांचा ह असा बदल होतो.** उदा. **मुह** (मुख), **मेह** (मेघ), **कहा** (कथा), **महु** (मधु), **विहल** (विफल), **लाह** (लाभ)

(२) **ट आणि ठ यांचा अनुक्रमे ड आणि ढ असा बदल होतो - वड** (वट), **सढ** (शठ)

(३) **न चा ण असा बदल होतो - नयण** (नयन), **पाण** (पान), **जण** (जन)

(४) **प चा व असा बदल होतो - पाव** (पाप), **साव** (शाप), **उवमा** (उपमा)

५. संयुक्त व्यंजनातील परिवर्तन -

(१) अर्धमागधीत आणि एकूण सर्वच प्राकृत भाषांमध्ये शब्दाच्या आरंभी संयुक्त व्यंजन येत नाही. उदा. **खय** (क्षय), **झाण** (ध्यान), **पहा** (प्रभा). मात्र या नियमालाही काही अपवाद आहेत. उदा. **ण्हाण** (स्नान), **म्हि, त्ति** (इति)

(२) सरूपीकरण - शब्दाच्या आरंभी नसलेल्या संयुक्त व्यंजनातील घटक वेगवेगळ्या वर्गातील असल्यास ते एकाच वर्गातील केले जातात. याला सरूपीकरणाचा किंवा समानीकरणाचा नियम असे म्हणतात.

उदा. **वक्खाण** (व्याख्यान), **वग्घ** (व्याघ्र), **निद्धण** (निर्धन), **अत्थ** (अर्थ), **उक्कंठा** (उत्कंठा), **पक्क** (पक्व).

(**टीप** - कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग आणि पवर्ग असे व्यंजनांचे पाच गट केलेले आहेत. त्याबद्दल माहिती व्याकरण विवेचन-१ मध्ये दिली आहे.)

(३) संयुक्त व्यंजन टाळण्यासाठी पुढील उपायांचाही अवलंब केला जातो.

(अ) मध्ये स्वर घालणे (स्वरभक्ति) - संयुक्त व्यंजनापैकी एक घटक अंत:स्थ वर्ण ह किंवा अनुनासिक असेल तर त्या दोन्ही घटकांमध्ये अ, इ, उ यापैकी एखादा स्वर घातला जातो. उदा. **दुवार** (द्वार), **किलेस** (क्लेश), **कसिण** (कृष्ण), **सिविण** (स्वप्न), **सिणाण** (स्नान), **पसिण** (प्रश्न)

(ब) अनुस्वार घालणे - **वंक** (वक्र), **पंख** (पक्ष), **अंसु** (अश्रु)

(क) आरंभी वर्ण घालणे (आदिवर्णागम) - **इत्थी** (स्त्री), **वुत्त** (उक्त), **विय** (इव)

(४) मूळ शब्दात संयुक्त व्यंजन नसताना त्याच्या अर्धमागधी रूपात संयुक्त व्यंजन येते. उदा. **तेल्ल** (तैल), **सेव्वा** (सेवा), **जोव्वण** (यौवन)

६. काही वर्णांत होणारे इतर बदल -

(अ) वर्णलोप - **देउल** (देवकुल), **राउल** (राजकुल), **रण्ण** (अरण्य)

(ब) वर्णांची अदलाबदल (वर्णविपर्यय) - **वाणारसी** (वाराणसी), **वाहणा** (उपानहौ), **दीहर** (दीर्घ), **मरहट्ठ** (महाराष्ट्र)

(क) य्, व् या व्यंजनांचा अनुक्रमे इ, उ असा बदल होणे. उदा. **अब्भिंतर** (अभ्यन्तर), **तुरियं** (त्वरितम्)

(ड) संयुक्त व्यंजनातील एका घटकाचा लोप झाल्यावर अगोदरचा स्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ होतो. उदा. **ऊसास** (उच्छ्वास), **कासव** (कश्यप), **माणूस** (मनुष्य), **सीस** (शिष्य)

अभ्यास

१. **खालील शब्दांचे अर्थ सांगा -**
जणणी, उयर, मेह, महुर, दंसण, सिलोग, लक्खण, विज्जा, ऊसव

२. **खालील शब्दांबद्दल अर्धमागधी शब्द द्या -**
पक्व, ऋषि, गौरव, वैद्य, यात्रा, विद्युत, शाप, प्रश्न, दैव, देवकुल

३. तइओ पाढो
केण किं कीरइ ?

१

अहं **नेत्तेहिं** पासामि ।
अम्हे **कण्णेहिं** सुणेमो ।
तुमं **हत्थेण** लिहसि ।
तुम्हे **हत्थेण** भुंजह ।
सो **मुहेण** भासइ ।
ते **पाएहिं** गच्छंति ।



२

पुरिसो चोरं **दंडेण** ताडेइ ।
चोरो **खंधेण** कुक्कुरं वहइ ।
अहं **लेहणीए** लेहं लिहामि ।
अहं **अलंकारेहिं** सरीरं विहूसेमि ।
सीहो **नहेहिं** गयं दारेइ ।
अज्जा **मालाए** जवइ ।
सो **नेत्तेण** काणो, **कण्णेहिं** च बहिरो ।
साहू **मोणेणं झाणेणं** च तवं आयरइ ।
सा **करगेण** जलं पिवइ ।
सउंदला **जलेण** रुक्खे सिंचइ ।
वेज्जो **ओसहेण** रोगं अवणेइ ।

३

लोहेण कित्ती नस्सइ ।
उज्जमेण पुरिसा धणं अज्जंति ।
विणएण सीसो सोहइ ।

पूयाए विण्हू तुस्सइ ।
अज्ज **पुण्णेहिं** मए गुरू दिट्ठो ।
अहंकारेण पुरिसो किं कज्जाइं साहेइ ?
परिस्समेण किं किं ण संभवइ ?
सावगो **धम्म-झाणेण** कम्मक्खयं करेइ ।

४

सो **वाउ-जाणेण** विएसं गच्छइ ।
भारवाह-जाणेण जणा वत्थूइं इओ तओ नेंति ।
बलीवद्द-सगडेण किसीवलो खेत्तं जाइ ।
जणा मरुभूमीए **उट्टेण** गच्छंति ।

५

लक्खणो **रामेण** सह वणं गच्छइ ।
सो **दहिणा** सह ओयणं भुंजइ ।
इंधणेण विणा किं अग्गी पज्जलइ ?
जलेण विणा किं मच्छो जीवइ ?
अंधस्स किं **दीवेण** ?
बहिरस्स किं **गीएण** ?
अलं अरसियस्स **संगेण** ।
अलं **परोवएसेण** ।

टीप - हा पाठ तृतीया विभक्तीच्या उपयोगासाठी योजला आहे. ठळक अक्षरातील शब्द तृतीया विभक्तीतील आहेत. कर्ता ज्या साधनाने कार्य साधतो त्या साधनाची तृतीया विभक्ती योजतात. अनेक प्रकारच्या अव्ययांबरोबरही तृतीया योजतात. वरील पाठात **सह** (बरोबर), **विणा** (शिवाय), **किं** (काय उपयोग ?), **अलं** (पुरे, नको) या अव्ययांबरोबर तृतीयेचा वापर करून दाखविला आहे.

शब्दार्थ

केण (केन) सर्व. कशाने
किं (किम्) सर्व. काय
नेत्त, कण्ण, हत्थ, मुह, पाय (नेत्र, कर्ण, हस्त, मुख, पाद) डोळे, कान, हात तोंड व पाय (हे शरीराचे अवयव आहेत)
दार (दारय) क्रि. फाडणे
मोण (मौन) नपुं. मौन
सउंदला (शकुंतला) स्त्री. शकुंतला
लोह (लोभ) पुं. लोभ
उज्जम (उद्यम) पुं. उद्योग
धम्मझाण (धर्मध्यान) नपुं. शुभचिंतन, धार्मिक विचारचिंतन
वाउजाण (वायुयान) नपुं. विमान
बलीवद्द (बलीवर्द) पुं. बैल
उट्ट (उष्ट्र) पुं. उंट
ओयण (ओदन) पुं. भात
कीरइ (क्रियते) केले जाते
कुक्कुर (कुकुर) पुं. कुत्रा
जव (जप्) क्रि. जप करणे
करग (करक) पुं. लोटा
झाण (ध्यान) नपुं. ध्यान, चिंतन
अव+णी (अप+नी) क्रि. दूर करणे
विण्हू (विष्णु) पुं. विष्णू
सावग (श्रावक) पुं. सत्य, अहिंसा इ. अनुव्रतांचे पालन करणारा गृहस्थ
कम्मक्खय (कर्मक्षय) पुं. कर्मांचा प्रभाव क्षीण करणे
भारवाहजाण (भारवाहयान) नपुं. मालगाडी
ने (क्रि.) नेणे
पज्जल (प्रज्वल्) क्रि. प्रज्वलित होणे
परोवएस (परोपदेश) पुं. दुसऱ्यांना उपदेश
मच्छ (मत्स्य) पुं. मासा

अभ्यास

१. **प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) मी कशाने पाहतो ?
(२) ते कशाने चालतात ?
(३) मी कशाने शरीर अलंकृत करतो ?
(४) साध्वी कशाने जप करते ?
(५) वैद्य कशाने रोग दूर करतो ?
(६) कीर्तीचा नाश कशामुळे होतो ?
(७) पुरुष कशाने धनार्जन करतात ?
(८) श्रावक कशाने कर्मक्षय करतो ?
(९) तो कशाबरोबर भात खातो ?
(१०) कोणाची संगत टाळावी ?

२. **विमान, मालगाडी व बैलगाडी यांना कोणते शब्द पाठात आले आहेत ?**

३. **या पाठातील सर्व प्रश्नार्थक वाक्यांचा अर्थ लिहून काढा.**

४. **व्याकरण विवेचनात दिलेली देव, माला आणि वण या शब्दांची तृतीयेची एकवचनी व अनेकवचनी रूपे लिहा. त्याप्रमाणे पुरिस, अज्जा व पुण्ण या शब्दांचीही तृतीयेची रूपे लिहा.**

❑❑❑

व्याकरण-विवेचन - (३)

नामे, विशेषणे

१. अर्धमागधीत शब्दाच्या शेवटी व्यंजन येत नसल्याने संस्कृतप्रमाणे व्यंजनान्त शब्द अर्धमागधीत नाहीत. फक्त स्वरान्त शब्दांचाच विचार करायचा आहे.

२. अर्धमागधीत संस्कृतप्रमाणे तीन वचने (एकवचन, द्विवचन व बहुवचन) नसून प्रचलित भारतीय भाषांप्रमाणे फक्त एकवचन आणि अनेकवचन अशी दोन वचने आहेत.

३. चतुर्थी ही विभक्ती वगळून इतर सर्व विभक्ती (प्रथमा, द्वितीया, तृतीया, पंचमी, षष्ठी, सप्तमी, संबोधन) अर्धमागधीत आहेत. चतुर्थीकरिता अर्धमागधीत सामान्यतः षष्ठी वापरली जाते. काही वेळा 'अट्ठा' हा प्रत्यय जोडून चतुर्थीचा अर्थ सिद्ध करतात.

४. पुंलिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग अशी तीन लिंगे अर्धमागधीत आहेत.

५. विशेषणे ही नामाप्रमाणेच चालतात. अव्ययाचे रूप बदलत नाही. म्हणून नामे व विशेषणे या प्रमाणे ती चालवली जात नाहीत.

अकारान्त पुं. देव शब्द

विभक्ती	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	देवो, देवे	देवा
द्वितीया	देवं	देवे, देवा
तृतीया	देवेण, देवेणं	देवेहि, देवेहिं
पंचमी	देवा, देवाओ	देवेहिंतो
षष्ठी	देवस्स	देवाण, देवाणं
सप्तमी	देवे, देवंसि, देवम्मि	देवेसु, देवेसुं
संबोधन	देव	देवा

देव शब्दाप्रमाणेच इतर अकारान्त पुं. नामे व विशेषणे चालवावीत. **काही अकारान्त पुं. शब्द - जिण, धम्म, जण, वाणर, गाम, सीह, कोव, सूरिय, चंद**

टीप - वर दिलेल्या विभक्तींचे अर्थ पुढे उदाहरणांच्या साहाय्याने स्पष्ट केले आहेत

(१) **प्रथमा** - अर्थ-कर्ता

बालओ सालं गच्छइ । (मुलगा शाळेत जातो)

फलं पडइ । (फळ पडते)

(कर्तरी प्रयोगात कर्त्याची प्रथमा विभक्ती असते. कर्मणी प्रयोगात कर्माची प्रथमा विभक्ती असते.)

(२) **द्वितीया** - अर्थ-कर्म

समणो **धम्मं** कहेइ (साधू धर्म सांगतो.)

(कर्तरी प्रयोगात कर्माची द्वितीया विभक्ती असते.)

(३) **तृतीया** - अर्थ-करण, कर्ता

रक्खगो **दंडेण** चोरं तालेइ। (रखवालदार काठीने चोराला मारतो.) - करण

रामेण रावणो हओ । (रामाने रावणाला ठार केले.) - कर्ता

(करण म्हणजे साधन. कर्मणी व भावे प्रयोगात कर्त्याची तृतीया विभक्ती होते.)

(४) **पंचमी** - अर्थ-अपादान (पासून हा अर्थ)

आगासाओ पाउसो वरिसइ । (आकाशातून पाऊस पडतो.)

(५) **षष्ठी** - षष्ठीचा दोन तऱ्हेने उपयोग होतो.

(१) चतुर्थीऐवजी - अमच्चो **निवस्स** वुत्तं कहेइ । (मंत्री राजाला वृत्त सांगतो.)

(२) संबंध दाखवण्यासाठी - **पायवस्स** फलं । (झाडाचे फळ)

(६) **सप्तमी** - अर्थ-अधिकरण (जागा, स्थळ हा अर्थ)

बालओ **आसणे** उवविसइ । (मुलगा आसनावर बसतो.)

(७) **संबोधन** - अर्थ-बोलावणे, निमंत्रण देणे

भो **सेवग**, आगच्छ तुरियं । (अरे सेवका ! लवकर ये.)

अकारान्त नपुं. वण शब्द

विभक्ती	**ए.व.**	**अ.व.**
प्रथमा	वणं	वणाइं, वणाणि
द्वितीया	-,,-	-,,-
संबोधन	वण	वणाइं, वणाणि

अन्य विभक्तींची रूपे देव शब्दाप्रमाणे होतात.

वण शब्दाप्रमाणे पुप्फ, पण्ण, घर, उज्जाण, कम्म, सील, पुण्ण इ. अकारान्त नपुं. शब्द चालवावेत.

आकारान्त स्त्री. माला शब्द

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्रथमा	माला	माला, मालाओ
द्वितीया	मालं	माला, मालाओ
तृतीया	मालाए	मालाहि, मालाहिं
पंचमी	मालाए, मालाओ	मालाहिंतो
षष्ठी	मालाए	मालाण, मालाणं
सप्तमी	मालाए	मालासु, मालासुं
संबोधन	माला, माले	माला, मालाओ

या प्रमाणेच साला, बाला, पूया, देवया, गंगा, कन्ना इ. आकारान्त स्त्री. शब्द चालवावेत.

टीप – धातुसाधित विशेषणे आणि इतर विशेषणे यांचे लिंग, वचन व विभक्ती या विशेष्याच्या लिंग, वचन व विभक्तीप्रमाणे बदलतात.

उदा. **सोहणो गामो । सोहणं वणं । सोहणा माला ।**

अभ्यास

१. **कंसातील सूचनांनुसार शब्दांची रूपे द्या –**

(१) जिण (द्वि. अ.व.) (२) सीह (स. ए.व.) (३) पुप्फ (प्र. अ.व.)
(४) देवया (पं. ए.व.) (५) पूया (तृ. अ.व.)

२. **रूपे ओळखा –**

(१) नरेसु (२) धम्माणं (३) पुण्णाइं (४) कन्नाए (५) सालं

३. **जोड्या लावा –**

अ – गट	आ – गट
(१) धवलो	(अ) देवयाओ
(२) वंकाइं	(आ) कागो
(३) कालो	(इ) सिंगाइं
(४) महुरेहिं	(ई) चंदो
(५) पुज्जाओ	(उ) फलेहिं

४. चउत्थो पाढो
कम्हा किं

सो **गेहाओ** निक्खमिऊण वणंतरे गच्छइ ।

रूक्खेहिंतो फलाइं पडंति ।

भमरो **पुप्फाओ** पुप्फं संचरइ ।

पायवाओ बलाया उड्डेंति ।

सो वणयरो **महु-कोसेहिंतो** महुं चिणेइ ।

वणेहिंतो जणाणं बहु-लाहो हवइ ।

संभमेण तीए **हत्थाओ** थाली पडिया ।

सिप्पिणो **पव्वयाओ** पाहाणा नेंति ।

सो किं **ममाओ** विसिट्ठो ?

बहु-मुल्लं रयणं **हत्थाओ** रयणायरम्मि पडइ ।

तंतुवाओ **कप्पासाओ** सुत्ताइं लहइ, **सुत्तेहिंतो** वत्थाइं करेइ ।

कण्हो **महुराओ** बारगाउरिं गच्छइ ।

साहाहिंतो पसाहाओ पाउब्भवंति ।

परिग्गहाओ लोहो संजायइ ।

साहू **सव्व-दुक्खेहिंतो** अप्पाणं मुंचइ ।

गिहे **सप्पाओ** भयं नत्थि ।

कामाओ कोहो जायइ ।

संकप्पेहिंतो कामो पहवइ ।

लोए **पुण्णेहिंतो** पावाइं अहिगाइं ।

बालओ **आमूलाओ** कहं सुणेइ ।

कडेहिंतो कम्मेहिंतो केसिमवि न मोक्खो ।

सीलं वरं **कुलाओ**, दारिद्दं च **रोगाओ**, विज्जा **रज्जाओ** वरं ।

विरम **राग-दोसेहिंतो** ।

मा बीहसु **आवयाओ** ।

टीप - पंचमी विभक्तीसाठी हा पाठ योजला आहे. ठळक अक्षरातील शब्द पंचमी विभक्तीत आहेत. पंचमीचा अर्थ 'अपादान' म्हणजे अलग होणे, दूर जाणे असा आहे. मराठीत ऊन, हून, पासून, कडून अशा शब्दांनी पंचमी व्यक्त होते. ज्या वस्तूपासून अलग व्हायचे तिची पंचमी असते. वृक्षापासून फळ पडते म्हणून 'वृक्ष' शब्दाची पंचमी योजून **'रुक्खाओ फलं पडइ'** असे वाक्य बनते. केवळ शारीरिक स्तरावरच नव्हे तर मानसिक, भावनिक वा बौद्धिक दृष्टीने दूर जाण्याच्या क्रियेसाठीही पंचमी वापरतात. 'बीह' (भिणे) क्रियेचा वापर करताना - ज्याच्यापासून भीती त्याची पंचमी असते. 'विरम' या क्रियापदाला पंचमीची अपेक्षा असते.

शब्दार्थ

संभम (सम्भ्रम) पुं. (मानसिक) गोंधळ
पव्वय (पर्वत) पुं. पर्वत
ममाओ 'अम्हे' सर्व. पं.ए.व. माझ्याहून
बलाय (बलाक) पुं. बगळा
सुत्त (सूत्र) पुं. दोरा, सूत
साहापसाहा (शाखाप्रशाखा) स्त्री. मोठ्या व छोट्या फांद्या
संजाय (सं + जन्) क्रि. उत्पन्न होणे.
अहिग (अधिक) वि. जास्त
मोक्ख (मोक्ष) पुं. सुटका, मुक्ती
कड (कृत) वि. केलेल्या
निक्खमिऊण (निष्क्रम्य) अ. बाहेर पडून
पाहाण (पाषाण) पुं. दगड
रयणायर (रत्नाकर) पुं. समुद्र
पायव (पादप) पुं. वृक्ष
तंतुवाय (तन्तुवाय) पुं. विणकर
कण्ह (कृष्ण) पुं. कृष्ण
पाउब्भव (प्रादुर्भव) क्रि. उद्भवणे
परिग्गह (परिग्रह) पुं. वस्तूंचा संचय
जाय (जन्) क्रि. उत्पन्न होणे
वरं (वरं) अ. बरे, अधिक चांगले

अभ्यास

१. या पाठातील पंचम्यन्त पदांचे अर्थ लिहा.

२. या पाठातील क्रियापदांचा छोटासा संग्रह करा.

३. या पाठातील अकारान्त, इकारान्त व उकारान्त पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुंसकलिंगी नामे लिहा.

४. अर्धमागधीत भाषांतर करा.

(१) डोळ्यांतून अश्रुधारा पडू लागल्या.
(२) हातातून लेखणी पडली.
(३) आई मुलाकडून काही अपेक्षा करत नाही. (क्रि. अवेक्खइ)
(४) कमला भांडणाला भिते. (क्रि. बीहइ)
(५) आम्हाला गाईपासून दूध मिळते. (क्रि. लहामो)

व्याकरण-विवेचन - (४)

क्रियापदांची रूपे

१. अर्धमागधीमध्ये वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ हे तीन काळ आणि आज्ञार्थ व विध्यर्थ हे दोन अर्थ आहेत.

२. प्रथम पुरुष (मी, आम्ही); द्वितीय पुरुष (तू, तुम्ही); तृतीय पुरुष (तो, ती, ते; ते, त्या, ती) हे तीन पुरुष आणि एकवचन व अनेकवचन अशी दोन वचने अर्धमागधीत आहेत.

३. सोयीसाठी धातूंचे पुढीलप्रमाणे तीन गण म्हणजे गट केलेले आहेत.

(१) **अकारान्त धातू** (उदा. गच्छ, पास)

(२) **अन्त्य अ चा ए होणारे धातू** (उदा. कर, गण)

(३) **अन्य स्वर अंती असणारे धातू** (उदा. गा, ने, हो)

वर दिलेल्या तीनही गणातील धातूंची वर्तमानकाळी रूपे पुढे दिली आहेत.

गच्छ (जाणे)

	ए.व.	अ.व.
प्र.पु.	गच्छामि	गच्छामो
द्वि.पु.	गच्छसि	गच्छह
तृ.पु.	गच्छइ	गच्छंति

या प्रमाणे पास, जाण, भण, गेण्ह, चिट्ठ, पुच्छ, हण, वट्ट इ. धातू चालवावेत.

कर (करणे)

	ए.व.	अ.व.
प्र.पु.	करेमि	करेमो
द्वि.पु.	करेसि	करेह
तृ.पु.	करेइ	करेंति

या प्रमाणे कह, गण, चोर इ. धातू चालवावेत.

गा (गाणे)

प्र.पु.	गामि	गामो
द्वि.पु.	गासि	गाह
तृ.पु.	गाइ	गायंति

या प्रमाणेच ठा, ण्हा, जा, वा, झिया इ. धातू चालवावेत.

ने (नेणे)

प्र.पु.	नेमि	नेमो
द्वि.पु.	नेसि	नेह
तृ.पु.	नेइ	नेंति

हो (असणे, होणे)

प्र.पु.	होमि	होमो
द्वि.पु.	होसि	होह
तृ.पु.	होइ	होंति

अभ्यास

१. **कंसातील सूचनेप्रमाणे वर्तमानकाळी रूपे लिहा.**

(१) गच्छ (तृ.पु.अ.व.)
(२) ने (द्वि.पु.अ.व.)
(३) ठा (द्वि.पु.ए.व.)
(४) हो (प्र.पु.ए.व.)
(५) भा (तृ.पु.अ.व.)

२. **खालील रूपे ओळखा -**

ण्हाइ, कहेसि, चिट्ठइ, होमो, झियायंति.

३. **रिकाम्या जागी कंसातील योग्य तो शब्द घालून वाक्ये लिहा -**

(१) कन्ना पाढसालं —। (गच्छसि/गच्छइ)
(२) नरा उज्जाणे —। (चिट्ठामि/चिट्ठंति)
(३) गंगाए जलं महुरं —। (होइ/होसि)
(४) मुणिणो —। (झियायंति/झियामो)
(५) नरा चोरं —। (हणइ/हणंति)

५. पंचमो पाढो
कस्स केण संबंधो ?

धणस्स चिंताए सो किसो जाओ ।
रुक्खस्स उवरि किं अत्थि ?
कलंबस्स साहा केरिसी होइ ?
नवणीयं **दहिणो** वियारो ।
इमस्स सुवण्ण-घडस्स को सामी ?
तव **नूयण-साडियाए** को वण्णो ?
रामस्स जणणी कोसल्ला ।
अज्जुणो **दोणस्स** सीसो आसी ।
सीसा **गुरुणो** चरणे नमंति ।
महिलाओ संझा-समए **नईए** तीरं गच्छंति ।
चंदस्स कोमुई सीयला, **सूरस्स** पयावो उण चंडो ।

सज्जणाणं वयणं हिय-करं ।
कूवस्स जलं महुरं, **समुद्दस्स** उण लवणं ।
एगया **पाडलिउत्तस्स** नरवई विहार-जत्ताए गच्छइ ।
वेज्जस्स ओसहेण सो रोग-रहिओ जाओ ।
धणस्स संचएण वि संतोसो न होइ ।
तस्स घरे **पोत्थगस्स** संगहो अत्थि ।

टीप - हा पाठ षष्ठी विभक्तीसाठी योजला आहे. ठळक अक्षरांतील शब्द षष्ठी विभक्तीत आहेत. कोणत्याही दोन वस्तूंचा, व्यक्तींचा व्यवहारात सतत एकमेकांशी संबंध येत असतो. सामान्यत: दोन पैकी 'ज्याच्याशी' संबंध सांगितला असेल तद्वाचक पदाची षष्ठी विभक्ती योजतात.

शब्दार्थ

किस (कृश) वि. कृश
नवणीय (नवनीत) नपुं. लोणी
साडिया (शाटिका) स्त्री. साडी
संगह (संग्रह) पुं. साठा, संचय
कोमुई (कौमुदी) स्त्री. चांदणे
कलंब (कदम्ब) पुं. कदंब वृक्ष
वियार (विकार) पुं. बदलते रूप
अज्जुण (अर्जुन) पुं. अर्जुन
पाडलिउत्त (पाटलीपुत्र) नपुं. नगराचे नाव
नरवइ (नरपति) पुं. राजा

अभ्यास

१. **पाठातील सर्व वाक्यांचे भाषांतर करा.**

२. **कंसातील शब्दांची षष्ठीची रूपे वापरा -**

(१) (पुढवी) सामी ।
(२) (नावा) बेडयं । (तांडा)
(३) (पायव) साहा ।
(४) (जियसत्तु) कण्णगा ।
(५) (अम्ह) लेहणी ।
(६) (गोयम) धणं ।
(७) (तिसला) पुत्ती ।
(८) (हत्थि) सुंडा ।
(९) (दुद्ध) दही ।
(१०) (नयरी) अहिवई ।

व्याकरण-विवेचन - (५)

नामे, विशेषणे

इकारान्त पुं. मुणि शब्द

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्र.	मुणी	मुणी, मुणिणो, मुणीओ
द्वि.	मुणिं	मुणी, मुणिणो, मुणीओ
तृ.	मुणिणा	मुणीहि, मुणीहिं
पं.	मुणिणो, मुणीओ	मुणीहिंतो
ष.	मुणिणो, मुणिस्स	मुणीण, मुणीणं
स.	मुणिंसि, मुणिम्मि	मुणीसु, मुणीसुं
सं.	मुणि	मुणी, मुणिणो, मुणीओ

या प्रमाणेच अग्गि, इसि, मणि, विहि, गिरि, पइ, कइ इ. इकारान्त पुं. शब्द चालवावेत.

इकारान्त नपुं. दहि शब्द

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्र.	दहि, दहिं	दहीइं, दहीणि
द्वि.	दहिं	दहीइं, दहीणि
सं.	दहि	दहीइं, दहीणि

अन्य विभक्तींची रूपे मुणि शब्दाप्रमाणे चालवावीत. **दहि शब्दाप्रमाणेच अच्छि, वारि, सप्पि, सालि इ. इकारान्त नपुं. शब्द चालवावेत.**

इकारान्त स्त्रीलिंगी भूमि शब्द

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्र.	भूमी	भूमी, भूमीओ
द्वि.	भूमिं	भूमी, भूमीओ
तृ.	भूमीए	भूमीहि, भूमीहिं
पं.	भूमीए, भूमीओ	भूमीहिंतो
ष.	भूमीए	भूमीण, भूमीणं
स.	भूमीए, भूमिंसि	भूमीसु, भूमीसुं
सं.	भूमि	भूमी, भूमीओ

या प्रमाणेच कुच्छि, संति, भत्ति, पीइ, कित्ति, बुद्धि इ. इकारान्त स्त्री. शब्द चालवावेत. नई (नदी), मही (पृथ्वी), सही (सखी) इ. ईकारान्त स्त्री. नामे भूमि शब्दाप्रमाणेच चालतात. तथापि सप्तमीचे एकवचन मात्र नईए, महीए, सहीए असे एकच रूप होते.

उकारान्त पुं. साहु (साधू) शब्द

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्र.	साहू	साहुणो, साहवो
द्वि.	साहुं	साहुणो, साहवो
तृ.	साहुणा	साहूहि, साहूहिं
पं.	साहुणो, साहूओ	साहूहिंतो
ष.	साहुणो, साहुस्स	साहूण, साहूणं
स.	साहुंसि, साहुम्मि	साहूसु, साहूसुं
सं.	साहु	साहुणो, साहवो

या प्रमाणेच वाउ, पहु, बंधु, रिउ, भाणु, भिक्खु, मच्चु इ. अन्य उकारान्त पुं. शब्द चालवावेत.

उकारान्त नपुं. महु (मधु - मध) शब्द

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्र.	महु, महुं	महूइं, महूणि
द्वि.	महुं	महूइं, महूणि
सं.	महु	महूइं, महूणि

अन्य विभक्तींची रूपे साहु शब्दाप्रमाणे चालवावीत. **महु शब्दाप्रमाणेच धणु, चक्खु, आउ, अंसु इ. उकारान्त नपुं. शब्द चालतात.**

उकारान्त स्त्री. धेणु शब्द

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्र.	धेणू	धेणू, धेणूओ
द्वि.	धेणुं	धेणू, धेणूओ
तृ.	धेणूए	धेणूहि, धेणूहिं
पं.	धेणूए, धेणूओ	धेणूहिंतो

ष.	धेणूए	धेणूण, धेणूणं
स.	धेणूए, धेणुंसि	धेणूसु, धेणूसुं
सं.	धेणु	धेणू, धेणूओ

याप्रमाणेच रज्जु, धाउ, (धातु), कणेरु (करेणु = हत्तीण) **इ. उकारान्त स्त्री. शब्द चालतात.** वहू, तणू या सारखी ऊकारान्त स्त्री. नामे धेणु या शब्दाप्रमाणेच चालतात. तथापि सप्तमी एकवचनी रूप मात्र वहूए, तणूए असे एकच होते.

अभ्यास

१. **(अ) पुढील शब्दांचे षष्ठी ए.व. लिहा -**
अग्गि, दहि, कुच्छि
(ब) पुढील शब्दांचे द्वितीया अ.व. लिहा -
विहि, वारि, भत्ति

२. **रूपे ओळखा -**
गिरीसु, पइणो, अच्छीणि, बुद्धिंसि, कित्तीहि

३. **कंसातील सूचनांप्रमाणे रूपे द्या -**
वाउ (स.ए.व.), भाणु (ष.ए.व.), महु (प्र.अ.व.), धेणु (पं.अ.व.), रज्जु (पं.ए.व.)

४. **रूपे ओळखा -**
पहुस्स, भिक्खूणं, महूहिंतो, धेणूए, रज्जूओ

६. छट्ठो पाढो
कम्मि किं

पासाए निवा वसंति ।

गिहे साहारण-जणा वसंति, **वणे** मुणिणो य निवसंति ।

सीसा **गुरुउले** वसंति ।

रुक्खस्स **छायाए** पहिओ उवविसइ ।

नईए नावाओ चलंति ।

मालासु विविह-वण्णाइं कुसुमाइं गुंफामि ।

गिरि-जणा **गिरिम्मि** महया दुक्खेण जीवंति ।

कईसु कालिदासो सेट्ठो ।

हत्थीसु एरावणो, **पक्खीसु** गरुलो य उत्तमो ।

दाणेसु अभय-दाणं सेट्ठं ।

सो **दिणम्मि** पढइ, **रत्तीए** सुवइ ।

अहं **संझा-भोयणे** केवलं ओयणं भुंजामि ।

तिलेसु तेल्लं विज्जइ ।

भमरो **पुप्फेसु** रमइ ।

रण्णे सीहा गज्जंति ।

सा **सेज्जाए** सुवइ ।

सुगो **पंजरे** बद्धो ।

निवो चोरे **बंदिसालाए** खिवइ ।

हेमंतस्स गिहं **आवण-वीहीए** अत्थि ।

निवस्स **मत्थए** रयणाणि छज्जंति ।

कीलंगणे बाला गेंदुएण कीलंति ।

बाल-कण्हस्स कित्ती **गोउलम्मि** पसरइ ।

संसारम्मि रागा दोसा य अणाइ-कालाओ संति ।

सत्तमंसि वरिसंसि अहं पुणो वि आगच्छामि ।
अत्थंगए चंदे सो गिहे आगओ ।
रोवंतीए जणणीए पुत्तो गओ ।
रामे वणाओ **पडिनियत्ते अओज्झाए** महूसवो होइ ।
महरिसिम्मि नमिम्मि निक्खंते, सव्वे जणा सोगाउला जाया ।

टीप - सप्तमी विभक्तीसाठी हा पाठ आहे. ठळक अक्षरातील शब्द सप्तमी विभक्तीत योजले आहेत. 'आधार' हा सप्तमीचा अर्थ आहे. त्यामध्ये, त्याच्यावर, ते करत असताना असा अर्थ व्यक्त करण्यासाठी जो आधार आहे, तद्‌वाचक शब्दाची सप्तमी योजतात. जसे - **रुक्खेसु विहगा वसंति ।** (पक्षी झाडावर राहतात) पाठातील शेवटची चार वाक्ये 'सति सप्तमी' या प्रकारची आहेत. 'अमुक एक गोष्ट घडली असताना किंवा घडत असताना' अशा अर्थी जे जे शब्द येतात त्या शब्दांची सप्तमी वापरतात.

शब्दार्थ

कम्मि किं? - कोण कोठे (राहतात)?
साहारण-जण (साधारण-जन) पुं. सामान्य लोक
गिरि-जण (गिरि-जन) पुं. पर्वतनिवासी लोक
गरुल (गरुड) पुं. गरुड
दिणम्मि - दिवसा
संझा-भोयणे - सायंकाळच्या जेवणात
सेज्जा (शय्या) स्त्री. बिछाना
हेमंत - मुलाचे नाव
गुरुउल (गुरुकुल) नपुं. गुरुकुल
छायाए - सावलीत
सेट्ठ (श्रेष्ठ) वि. श्रेष्ठ
एरावण (ऐरावत) विशेषनाम, इंद्राचा हत्ती
रत्तीए - रात्री
ओयण (ओदन) पुं. भात
सुग (शुक) पुं. पोपट
आवण-वीहि (आपण-वीथि) स्त्री. बाजारचा रस्ता

छज्जंति - शोभतात
कीलंगण (क्रीडांगण) नपुं. खेळण्याचे मैदान
गेंदुय (कन्दुक) पुं. चेंडू
गोउल (गोकुल) नपुं. गोकुळ

अभ्यास

१. **पाठातील वाक्यांचे भाषांतर करा.**

२. **या पाठात अनेक क्रियापदे आली आहेत. 'अ' गटात क्रियापदे व 'आ' गटात त्यांचे मराठीत अर्थ दिले आहेत. त्यांच्या जोड्या लावा.**

'अ' गट - वस, निवस, उवविस, चल, गुंफ, जीव, सुव, पढ, भुंज, रम, गज्ज, खिव, अस, छज्ज, कील, पसर, आगच्छ, गच्छ, हो

'आ' गट - बसणे, चालणे, गुंफणे, निवास करणे, जगणे, शोभणे, होणे, फेकणे, असणे, येणे, जाणे, झोपणे, वाचणे, खाणे, रमणे, खेळणे, गर्जना करणे, पसरणे, राहणे

३. **खालील मराठी वाक्यांचे अर्धमागधीत भाषांतर करा -**

(१) पुस्तकात पाठ आहे.
(२) कावळ्याला कोण पिंजऱ्यात ठेवील ? (ठव)
(३) फांदीवर पाने आहेत.
(४) माझे मन धर्मात रमते.

व्याकरण-विवेचन - (६)

सर्वनामे

१. **अम्ह** (मी, आम्ही) हे प्रथमपुरुषी, **तुम्ह** (तू, तुम्ही) हे द्वितीयपुरुषी आणि **त** (तो, ती ते, ते त्या, ती) ही तृतीयपुरुषी सर्वनामे आहेत. यापैकी **अम्ह** आणि **तुम्ह** या सर्वनामांच्या रूपांचा या वर्षी अभ्यास करायचा आहे.

२. **अम्ह आणि तुम्ह या सर्वनामांची तिन्ही लिंगात सारखीच रूपे होतात.**

३. सर्वनामाला संबोधनाचे रूप नसते.

अम्ह

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्र.	अहं, हं	अम्हे, वयं
द्वि.	ममं, मं	अम्हे, णे

तृ.	मए, मइ	अम्हेहिं
पं.	ममाओ, मत्तो	अम्हेहिंतो
ष.	मम, मह, मज्झ, मे	अम्हाणं, अम्हं, णो
स.	ममंसि, मइ	अम्हेसुं

तुम्ह

विभक्ती	ए.व.	अ.व.
प्र.	तुमं, तं, तुमे	तुम्हे, तुज्झे, तुब्भे
द्वि.	तुमं, तं	तुम्हे, तुज्झे, तुब्भे, भे
तृ.	तुए, तुमे, तए, तुमए	तुम्हेहिं, तुज्झेहिं, तुब्भेहिं
पं.	तुमाओ, तुमत्तो	तुम्हेहिंतो, तुब्भेहिंतो
ष.	तव, ते, तुज्झ, तुम्ह, तुह	तुम्हाणं, तुम्हं, तुब्भं
स.	तुमंसि, तुमम्मि, तइ	तुम्हेसुं, तुज्झेसुं, तुब्भेसुं

त (तो, ती, ते), **क** (कोण), **ज** (जो, जी, जे), **एय, इम** (दोन्हींचा अर्थ हा, ही, हे) या सर्वनामांचे अर्थ लक्षात ठेवावेत. त्यांच्या रूपांचा परिचय पुढील वर्षी होईल.

अभ्यास

१. रूपे ओळखा -

अम्हेहिंतो, ममंसि, तुम्हेहिं, तुम्हे, मए

२. रूपे द्या -

(१) अम्ह - पं.ए.व., स.अ.व. (२) तुम्ह - तृ.ए.व., ष.अ.व.

३. रिकाम्या जागी कंसातील शब्दाचे योग्य रूप योजून वाक्ये लिहा -

(१) — (अम्ह) उज्जाणं पासामो ।

(२) तुम्हे नइं — । (गच्छ व.का.)

(३) जणणी — (अम्ह) भणइ ।

(४) — (तुम्ह) आयरियं पसिणं पुच्छसि ।

(५) — (अम्ह) फलाइं नेमि ।

७. सत्तमो पाढो
रुक्खा सप्पुरिसा विय

इमस्सिं भुवणे विहिणा रुक्खा हु नराणं उवगारट्ठं निम्मिया। रुक्खा अन्नेसिं पि पाणीणं उवयारं करेंति। अओ 'रुक्खा सुयण' त्ति कइणो वयंति। रुक्खाणं सव्वे वि अवयवा उवजुत्ता हवंति। जणा रुक्खाणं खंधे, साहाओ य गिह-निम्माण-कज्जे पउंजंति। घरेसु रुक्खाणं कट्ठेहिं चिय नाणा-विहाइं उवगरणाइं घडियाइं होंति। रुक्खेहिंतो अम्हे अन्नं लहामो। रुक्खेसु पक्खिणो नीडाइं करेंति। वेज्जा रुक्खेहिंतो ओसहाणि वि कुव्वंति। रुक्खा लयाओ य भुवणस्स सुंदरत्तणं वड्ढावेंति पज्जावरणं च रक्खंति। रुक्खा सयं जणाणं दूसियं वाउं सेवंति पाणवाउं च जणाणं अप्पेंति। तहवि कयग्घा जणा दव्वस्स कए रुक्खे छिंदंति। जइ अम्हे रुक्खे रक्खामो, ता ते वि अम्हाणं रक्खणं करेंति। अओ वण-संवड्ढणट्ठं अम्हे पयत्तं करेमो। वणाणि विउलं पाउसं देंति। एवं अणेग-विहा रुक्खा माणवाणं मित्ता होंति। नमो नमो परोवयार-जुत्ताणं रुक्खाणं।

छायं अन्नस्स कुव्वंति चिट्ठंति सयमायवे।
फलाइं भक्खणट्ठं च रुक्खा सप्पुरिसा विय॥

शब्दार्थ

इमस्सिं - सर्व.स. ह्या

उवगारट्ठं (उपकारार्थं) क्रि.वि. उपकारासाठी

कइ (कवि) पुं. कवी

उवजुत्त (उपयुक्त) वि. उपयोगी

साहा (शाखा) स्त्री. फांदी

कट्ठ (काष्ठ) नपुं. लाकूड

नीड - नपुं. घरटे

कयग्घ (कृतघ्न) वि. केलेले उपकार न स्मरणारा

सयमायवे (सयं+आयवे) स्वतः उन्हात

विहि (विधि) पुं. विधाता, ब्रह्मदेव

अओ (अतः) अ. म्हणून

वय (वद्) क्रि. बोलणे

खंध (स्कन्ध) पुं. खोड

पउंज (प्र+युज्) क्रि. जोडणे

उवगरण (उपकरण) नपुं. साधन

पज्जावरण (पर्यावरण) नपुं. पर्यावरण

कुव्वंति - क्रि. करतात

सप्पुरिस (सत्पुरुष) पुं. सज्जन

अभ्यास

१. **प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) वृक्षांचे विविध उपयोग सांगा.

(२) पाठाच्या अखेरीस आलेल्या श्लोकाचे भाषांतर करा.

२. **रूपे ओळखा** (व्याकरण विवेचनाचा आधार घ्या.)

करेंति, खंधे, लहामो, पाउसं, चिट्ठंति, अओ

३. **जोड्या लावा -**

'अ' गट	'आ' गट
(१) रुक्खाणं अवयवा	(अ) रुक्खा पाणवाउं अप्पेंति।
(२) रुक्खा भुवणस्स	(आ) पयत्तं करेमो।
(३) दूसियं वाउं सेविऊण	(इ) सव्वे वि उवजुत्ता।
(४) वणसंवड्ढणट्ठं अम्हे	(ई) पज्जावरणं रक्खंति।

४. **खालील अर्धमागधी वाक्यांचे भाषांतर करा -**

(१) अत्थि इहेव भारहे वासे कोसला नाम नयरी।

(२) सव्वे जीवा सुहं इच्छंति। न कोइ दुहं इच्छइ।

(३) गामाणुगामं हिंडंतो सो एगया देवउले पविट्ठो।

(४) एगो दरिद्दो पुरिसो भिक्खाए कुडुंबं पोसेइ।

८. अट्ठमो पाढो
अवि तुमं जाणसि ?

कस्स जंतुणो मुहे जीहा न होइ ?
मगरस्स मुहे जीहा न होइ ।

को नेत्तेहिं सुणइ ?
भुयंगमो नेत्तेहिं सुणइ ।

को विहंगो दूराओ वि सुट्ठु पासइ ?
गिद्धो दूराओ वि सुट्ठु पासइ ।

को अप्पणो अवच्चं भक्खइ ?
मज्जारी अप्पणो अवच्चं भक्खइ ।

को पक्खी सप्पमवि भुंजिऊण जीवइ ?
मोरो सप्पमवि भुंजिऊण जीवइ ।

को जंतू पुप्फाणं सारं घेत्तूण परस्स देइ ?
महु-मक्खिया पुप्फाणं सारं घेत्तूण परस्स देइ ।

को पक्खी 'परपुट्ठो'त्ति पसिद्धो ?
कोइलो 'परपुट्ठो'त्ति पसिद्धो ।

को खगो दिणे न पासइ ?
उलूओ दिणे न पासइ ।

को विहंगो एग-चक्खू ?
कागो एग-चक्खू होइ ।

को नरो अंधो ?
जो नरो इयराणं गुणे न पासइ सो अंधो ।

कम्मि विसए अम्हे बहिरा होमो ?
अम्हाणं पसंसा-विसए अम्हे बहिरा होमो ।

शब्दार्थ

अवि तुमं जाणसि? - तू जाणतोस काय?
जंतुणो - प्राण्याच्या
नेत्तेहिं (नेत्रैः) नपुं. डोळ्यांनी
सुण (श्रु) क्रि. ऐकणे
अवच्च (अपत्य) नपुं. पिलू, अपत्य
दिणे (दिने) पुं. दिवसा
एगचक्खु (एकचक्षु) वि. एकाक्ष, एक डोळ्याचा
जीहा (जिव्हा) स्त्री. जीभ
भुयंगम (भुजङ्गम) पुं. साप
गिद्ध (गृध्र) पुं. गिधाड
मज्जारी (मार्जारी) स्त्री. मांजरी
परपुट्ठ (परपुष्ट) वि. दुसऱ्या (पक्ष्या) कडून पोसलेला, कोकिळ
उलूअ (उलूक) पुं. घुबड
पसंसा (प्रशंसा) स्त्री. स्तुती
बहिर (बधिर) वि. बहिरा

अभ्यास

१. **या पाठात आलेल्या सर्व पक्ष्यांच्या व प्राण्यांच्या नावांचा संग्रह करा.**

२. **कोणत्या प्रकारच्या माणसांची संभावना 'आंधळे' व 'बहिरे' अशी केली आहे ?**

३. **संस्कृत शब्दांच्या साम्याच्या आधारे जोड्या लावा -**

'अ' गट	'आ' गट
(१) कुत्रा (श्वान)	(अ) विग
(२) अस्वल (भल्लूक)	(आ) साण
(३) लांडगा (वृक)	(इ) वग्घ
(४) वाघ (व्याघ्र)	(ई) सीह
(५) सिंह	(उ) गरुल
(६) गरुड	(ऊ) भल्लूअ
(७) ससाणा (श्येन)	(ऋ) कवोय
(८) कबूतर (कपोत)	(ए) चडया
(९) चिमणी (चटका)	(ऐ) सेण

भाषांतर करा -

एत्थंतरे को वि वाणरो तत्थ आगओ। तेण पाहेय-भंडं घेत्तूण सव्वं अन्नं भक्खियं। तत्थ को वि छगलगो तणं चरइ। अणेण उच्छिट्ठ-हत्थेण तस्स मुहं लिंपियं।
(पाहेयभंड-शिदोरीचे भांडे, छगलग-बकरा, उच्छिट्ठहत्थ-उष्टा हात)

९. नवमो पाढो
भगवं महावीरो

अत्थि इहेव भारहे वासे कुंडिणउरे सिद्धत्थो नाम खत्तिय-गणाहिवई। तस्स तिसला नाम देवी। सा य सुसीला सुरूवा य। चेत्त-सुद्ध-तेरसमे सोहणे दिणे सुप्पहाए सा सव्व-गुण-संपन्नं पुत्तं पसूया। जया एसो सुह-जीवो तिसलाए गब्भे आगओ, तओ सिद्धत्थ-महारायस्स विहवो पइ-दिणं वड्ढइ। अओ तस्स बालस्स वद्धमाणो त्ति नामं कयं। अप्पणो वीरत्तेण सो महावीरो त्ति पसिद्धो जाओ।

बालत्तणाओ विविहं हिंसाइ-दुक्खं देक्खिऊण सो संसाराओ विरत्तो जाओ। तीसमे वरिसे महावीरेण मुणि - दिक्खा गहिया। तवं काउं सो वणे गओ। दुवालस-वरिस - पज्जंतं महावीर-मुणिणा उग्गं तवं कयं। तवग्गिणा सेस-कम्माइं डहिऊण भगवं महावीरो केवली होइ। सो इंदियाइं जयइ त्ति जिणो वि कहिओ।

गोयमाइ-एक्कारस-माहण-सीसा भगवओ महावीरस्स गणहरा जाया। तस्स समोसरणं गामाणुगामं चलइ। सो सव्वाणं अद्धमागही-भासाए हिओवएसं करेइ-

'भो भव्व-जीवा, अप्पा कत्ता विकत्ता य। अप्पा मित्तो अमित्तो य। जीवो जहा सुहासुह-कम्मं कुणइ, तहा तस्स सुह-दुक्खं भुंजइ। जीवो सुकम्मेण च्चिय सेट्ठो होइ न जम्मेण। सव्वे पाणा सुहं इच्छंति न दुक्खं। सव्वेसिं जीवियं पियं। नाइवाएज्ज किंचण। अहिंसा परमो धम्मो। अओ भूएसु मेत्ती कायव्वा।'

एवं सव्व-जीवाणं कल्लाण-करं धम्मं कहेंतो भगवं महावीरो पावाउरिं गच्छइ। तत्थ सो अस्सिण-अमावस्साए सुप्पहाए निव्वाणं गओ।

एयं क्खु भगवओ महावीरस्स दिव्वं जीवणं। नमो नमो भगवओ महावीरस्स।

शब्दार्थ

इहेव (इह+एव) क्रि.वि. येथेच

सुह (शुभ) वि. शुभ

विहव (विभव) पुं. वैभव

सेस (शेष) वि. बाकीचे

केवली (केवली) पुं. केवलज्ञान म्हणजे सर्वज्ञता प्राप्त झालेली व्यक्ती

गणहर (गणधर) पुं. गणधर, तीर्थंकराचे शिष्य

भुंज (भुज्) क्रि. भोगणे

गणाहिवइ (गणाधिपति) पुं. संघाचा अधिपती

पसूया (प्रसूता) क्रि. प्रसूत झाली, जन्म दिला

अणायार (अनाचार) पुं. अनाचार

डह (दह्) क्रि. जळणे, जाळणे

समोसरण (समवशरण) नपुं. तीर्थंकराची धर्मसभा

नाइवाएज्ज (न+अतिपातयेत्) क्रि. हिंसा करू नये

पावाउरी (पावापुरी) स्त्री.पावापुरी नावाची नगरी

अभ्यास

१. **खालील प्रश्नांची उत्तरे द्या -**

(१) भ.महावीरांचे माता-पिता कोण होते ?

(२) बालकाला वर्धमान असे नाव का दिले ?

(३) महावीर मुनींनी किती वर्षे तपाचरण केले ?

(४) भ.महावीरांना जिन असे का म्हटले जाते ?

(५) भ.महावीरांनी कोणत्या भाषेत हितोपदेश केला ?

(६) भ.महावीरांचा हितोपदेश आपल्या शब्दात लिहा.

(७) भ.महावीर कोठे व केव्हा निर्वाणाला गेले ?

२. **अर्धमागधीत प्रतिशब्द द्या -**

त्रिशला, चैत्र, सुप्रभात, प्रसूता, वर्धते, वर्धमान, दीक्षा, द्वादश, तपोग्नि, हितोपदेश, शुभाशुभ, निर्वाण

३. **रूपे ओळखा -**

महारायस्स, वड्ढइ, देक्खिऊण, संसाराओ, भासाए, जम्मेण, इच्छंति, पावाउरिं

४. **भ.महावीरांचे जीवन थोडक्यात लिहा.**

१०. दसमो पाढो
भावत्थं चिंतए निच्चं

एगम्मि नयरे एगा महिला । तस्स भत्ता दुग्गईए मओ । सा कट्ठाइं विक्किणिऊण वित्तिं करेइ । एगया सा खुड्डगं पुत्तं घेत्तूण गामं गया । सो दारओ जणणिं पुच्छइ, 'कहिं मम पिया ?' तीए कहियं, 'मओ !' सो पुणो पुच्छइ, 'केण पगारेण सो जीवइ ?' सा भणइ, 'ओलग्गाए ।' सो भणइ, 'अहं पि ओलग्गामि ।' सा भणइ, 'न जाणसि ओलग्गिउं ।' सो पुच्छइ, 'कहं ओलग्गिज्जइ ।' सा भणइ, 'विणयं करेहि । जोक्कारो कायव्वो । नीयं चंकमियव्वं ।'

तओ सो नयरं गओ । अंतरा अणेण के वि वाहा मिगाण गहणत्थं निलुक्का दिट्ठा । तओ सो वड्डेण सद्देणं तेसिं 'जोक्कारो' त्ति भणइ । तेण सद्देण मिगा पलाइया । तओ तेहिं रुट्ठेहिं सो ताडिओ । सब्भाओ अणेण कहिओ । तओ तेहिं भणियं, 'जया एरिसं पेच्छसि, तया निलुक्कं तहिं आगंतव्वं । न य उल्लविज्जइ ।'

तओ अग्गे रयगा दिट्ठा । सो निलुक्कंतो सणियं सणियं एइ । तं वेलं रयगाणं पोत्ताइ चोरा हरंति । सो निलुक्कंतो एइ । ते चिंतंति 'एस चोरो ।' 'तेहिं गहिओ बंधिओ पिट्टिओ य । सब्भावे कहिए मुक्को । तेहिं भणियं, 'एवं भण ।

सुद्धं नीरयं निम्मलं च भवउ, ऊसं पडउ ।'

तओ सो नयर-संमुहं एइ । एगत्थ बीयाणि वाविज्जंति । तेण भणियं, 'भट्टा, सुद्धं नीरयं निम्मलं च भवउ, ऊसं पडउ ।' तओ तेहिं, 'किं एसो अकारण-वेरी एवं भासइ' त्ति गहिओ पिट्टिओ य । सब्भावे कहिए मुक्को । भणिओ 'एरिसे कज्जे एवं भण । बहुं एरिसं भवउ । भंडं भरेह एयस्स ।'

तओ पुणो नयर-सम्मुहं एइ । एगत्थ मडयं नीयमाणं दट्ठूण भणइ, 'बहु एरिसं भवउ । भंडं भरेह एयस्स ।' तत्थ वि गहिओ, पिट्टिओ । सब्भावे कहिए मुक्को । भणिओ य एरिसे कज्जे एवं भण । 'एरिसे णं अच्चंत-विओगो भवउ ।' अण्णत्थ विवाहे भणइ, 'अच्चंत-विओगो भवउ ।' तत्थ वि पिट्टिओ । सब्भावे कहिए मुक्को । भणिओ, 'एरिसे कज्जे एवं भण । निच्चं एरिसयाणि पेच्छंतया होह । सासयं एवं भवउ ।'

तओ गच्छंतो एगत्थ नियल-बद्धं चोरं दट्ठूण एवं भणइ, 'निच्चं एरिसयाणि पेच्छंतया होह । सासयं एवं भवउ ।' तत्थ वि गहिओ, पिट्टिओ । सब्भावे कहिए मुक्को । भणिओ, 'एरिसे कज्जे एवं भण । एयाओ तुम्हाणं लहुं मोक्खो हवउ ।'

तओ गच्छंतो केइ मित्ता संघाडयं करेंतो पेच्छइ । भणइ, 'एयाओ तुम्हाणं लहुं मोक्खो हवउ ।' तओ तत्थ वि पिट्टिओ । सब्भावे कहिए मुक्को ।

तओ नयरे तत्थ एगस्स कुल-पुत्तस्स सेवंतो अच्छइ । अन्नया दुब्भिक्खे तस्स कुल-पुत्तस्स भज्जाए अंबेल्लिया रंधिया । तस्स भज्जाए सो भणिओ, 'जाहि ।

महा-जण-मज्झाओ सद्दावेहि । भुंजाहि, सीयला होहि ।' तेण गंतूण महायण-मज्झे वड्डेणं सद्देण भणियं, 'एहि । एहि । सीयला होइ अंबेल्लिया ।' सो जणाणं मज्झे लज्जिओ जाओ । घरं गंतूण भणिओ, 'एरिसे कज्जे नीयं आगंतूण कण्णे कहिज्जइ ।' अन्नया तस्स घरं पलित्तं । तस्स भज्जाए भणिओ, 'लहुं सद्दावेहि ठक्कुरं ।' तओ जाव सो सणियं सणियं तत्थ गंतूण कण्णे कहेइ, ताव सव्वं घर-दुवारं झामियं ।

एवं भावत्थं अजाणमाणो सो दारओ सेवग-कम्मं करेउं पि न तीरइ । केणावि कहियं, 'सेवा-धम्मो परम-गहणो ।'

शब्दार्थ

भावत्थं चिंतए निच्चं - कोणाच्याही बोलण्याचा भावार्थ लक्षात घेतला नाही व सांगकाम्याप्रमाणे केवळ आज्ञा पालन करत राहिला, तर व्यवहारात निभाव लागणे कठीण आहे. साधी नोकरी म्हटली तरी त्यात वागण्या-बोलण्याचे चातुर्य असणे फार जरूरीचे आहे.

दुग्गइ (दुर्गति) स्त्री. गरिबी, दैन्यावस्था

ओलग्ग (दे.) क्रि. सेवा करणे, चाकरी करणे

नीयं चंकमियव्वं - सावकाश, झुकून चालावे

निलुक्क (दे.) वि. लपलेला

सब्भाव (सद्भाव) पुं. खरी गोष्ट

न य उल्लविज्जइ - मोठमोठ्याने बडबड करू नये

सणियं सणियं (शनैः शनैः) अ. हळूहळू

नीरय (निरज) वि. धूलिकणरहित

ऊस - दे. कोरडे, ओस, रुक्ष

भट्टा (भर्ता) सं. बाबांनो

मडय (मृतक) प्रेत

नियलबद्ध (निगडबद्ध) वि. साखळदंडांनी बांधलेला

सीयला होहि - थंडगार होईल

झामिय (ध्मात) वि. जळलेले

पलित्त (प्रदीप्त) वि. पेटलेले

वित्ति (वृत्ति) स्त्री. उपजीविका

खुड्डग (क्षुल्लक) वि. छोटा

विणयं करेहि - नम्रतेने राहावे

जोक्कार (जयजयकार) पुं. जयजयकार, रामराम

वाह (व्याध) पुं. शिकारी

मिग (मृग) पुं. हरिण

वड्डेण सद्देण - मोठमोठ्या आवाजात

रयग (रजक) पुं. धोबी

पोत्त (दे.) नपुं. कपडे

सब्भावे कहिए मुक्को - खरी गोष्ट सांगितल्यावर सोडून दिले

बीयाणि वाविज्जंति - धान्य पेरले जात होते

सासय (शाश्वत) वि. कायमचे

संघाडय (सङ्घाटक) पुं. समूह

अंबेल्लिया (दे.) स्त्री. आंबिल, पेज

अभ्यास

१. **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) गरीब महिलेला तिच्या मुलाने कोणता प्रश्न विचारला ? तिने कोणते उत्तर दिले ?

(२) गरीब महिलेच्या मुलाला कोणाकोणाकडून मार बसला व का ? थोडक्यात लिहा.

(३) गरीब महिलेचा मुलगा त्या कुलपुत्राच्या घरादाराच्या विनाशास मूर्खपणामुळे कसा कारणीभूत झाला ?

(४) या पाठाचे तात्पर्य ४-५ वाक्यांत लिहा.

२. **रूपे ओळखा -** ओलग्गामि, कायव्वो, करेहि, चिंतंति, नीयमाणं, दट्ठूण

३. **या पाठात आलेल्या पुढील शब्दांचे तत्सम, तद्भव व देशी असे वर्गीकरण करा -**

महिला, मिगा, चोरा, जोक्कार, निम्मल, सब्भाव, भण, अग्ग, ऊस, अंबेल्लिया, पलित्त, ठक्कुर, कट्ठ, वड्ड, नियलं, घरं, सासय, रयग, भास, गहण

४. **खालील पाठ्येतर उताऱ्याचे भाषांतर करा -**

पच्छा सो पुरिसो चिंतेइ, 'किं मज्झ बहुएण परिभमणेण । एयं चेव ओलग्गामि ।' सो तेण ओलग्गिओ । विणएण आराहिओ सो भणइ, 'किं करेमि ?' सो भणइ, 'अहं मंदभग्गो तुम्ह सरणमागओ । सिद्धपुरिसो चिंतेइ, 'अईव दुहिओ दीसइ । ता करेमि इमस्स उवयारं ।' तओ तेण विज्जाभिमंतिओ घडो तस्स दिन्नो ।

❑❑❑

व्याकरण-विवेचन - (७)

भूतकाळ, आज्ञार्थ

१. अर्धमागधीत प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशा तिन्ही पुरुषी, एकवचनी **इत्था** आणि अनेकवचनी **इंसु** असे प्रत्यय भूतकाळी अर्थाने धातूला जोडण्यात येतात.

उदाहरणे -

धातू	ए.व.	अ.व.
गच्छ	गच्छित्था	गच्छिंसु
कर	करित्था	करिंसु
हो	होइत्था, होत्था	होइंसु

ने	नेइत्था	नेइंसु
गा	गाइत्था	गाइंसु

टीप - (१) अर्धमागधीत भूतकाळी रूपांचा उपयोग फारच कमी प्रमाणात केला जातो. भूतकाळाचा अर्थ दाखवण्यासाठी प्राय: भूतकालवाचक धातुसाधित विशेषणांचा उपयोग केला जातो. यांची माहिती व्याकरण-विवेचन ९ मध्ये दिलेली आहे. कथा वर्णनात भूतकाळी अर्थाने पुष्कळ वेळा वर्तमानकाळाचाही उपयोग केला जातो.

(२) अर्धमागधी वगळून अन्य प्राकृतभाषांमध्ये भूतकाळासाठी क्वचित **सी** सि), **ही** व **हीय** (हीअ) हे प्रत्यय सर्व पुरुषी व दोन्ही वचनांत वापरतात. उदा -

कर - कासि, काही, काहीय, (काहीअ)

कथा वाङ्मयात **गच्छीय, हसीय, पडीय, भणीय** अशी भूतकाळी रूपे वापरलेली आढळतात.

आज्ञार्थ

गच्छ

	ए.व.	अ.व.
प्र.पु.	गच्छामु	गच्छामो
द्वि.पु.	गच्छ, गच्छसु, गच्छाहि	गच्छह
तृ.पु.	गच्छउ	गच्छंतु

कर

	ए.व.	अ.व.
प्र.पु.	करेमु	करेमो
द्वि.पु.	कर, करेसु, करेहि	करेह
तृ.पु.	करेउ	करेंतु

ने

	ए.व.	अ.व.
प्र.पु.	नेमु	नेमो
द्वि.पु.	नेसु, नेहि	नेह
तृ.पु.	नेउ	नेंतु

हो

	ए.व.	अ.व.
प्र.पु.	होमु	होमो
द्वि.पु.	होसु, होहि	होह
तृ.पु.	होउ	होंतु

गा

	ए.व.	अ.व.
प्र.पु.	गामु	गामो
द्वि.पु.	गाहि, गासु	गाह
तृ.पु.	गाउ	गायंतु

अभ्यास

१. **रिकाम्या जागी भूतकाळाची योग्य ती रूपे वापरा -**

(१) इसिणो वयाइं —। (पाल)

(२) बालओ सालं —। (गच्छ)

(३) मणुस्सा फलाइं —। (भक्ख)

(४) समणो तवं —। (आयर)

(५) महावीरो धम्मं —। (भास)

२. **रिकाम्या जागी आज्ञार्थाची योग्य ती रूपे वापरा -**

(१) मा तुमं पावायरणं —। (कर)

(२) बालया पाढसालं —। (गच्छ)

(३) तुम्हे भोयणं —। (कर)

(४) मिलिंदो उज्जाणे —। (चिट्ठ)

(५) कमला चित्तं —। (पास)

३. **पुढील रूपे ओळखा -**

(अ) करित्था, आगच्छिंसु, भणित्था, पुच्छित्था, पडिंसु

(आ) कहेउ, नेह, होंतु, ठामु, पासह



११. एक्कारसमो पाढो
धणेसर-कहाणयं

वसंतपुरे नयरे धणवइ-सिट्ठि-सुओ धणेसरो अहेसि । सो य जणणी-जणए कालगए दरिद्दो जाओ । एगया सो चिंतिउं पवत्तो -

'उच्चं नीयं कम्मं कीरइ देसंतरे धण-निमित्तं ।

सह-वड्ढियाण मज्झे लज्जिज्जइ नीय-कम्मेण ॥'

एवमालोइऊण, संठविऊण कुडुंबं सो दूर-देसे गओ पत्तो य एगं गामं । 'न पयाणएहिं दालिद्दं छिज्जइ' त्ति ठिओ तत्थ । गामिल्लेहिं भणिओ, 'गोरूवाइ चारेहि । लहसि मासंते पइगोरूवयं रूवयं' ति । सो वि अण्णं ववसायं अलहंतो चरिउं पवत्तो । तस्स य पंच रूवय-सयाइं पइमासं मिलंति । पंचहिं वासेहिं जाओ महा-धणो । तओ मुत्तूण गोवालत्तं लग्गो वाणिज्जे । दुवालस-वासेहिं जाओ अणेग-धण-कोडीणं सामी । चिंतिउं पवत्तो,

'किं तीए लच्छीए नरस्स जा होइ अन्न-देसम्मि ।
न कुणइ सुयणाण सुहं खलाण दुक्खं च नो कुणइ ॥'

तओ सो गमण-मणो चिंतेइ, 'अंतरा महंतं रण्णं अत्थि। तत्थाणेगे चोरा पडिवसंति । ते महंतं पि सत्थं अभिद्दवंति । ता न एसा संपया निव्वाहिउं तीरइ' त्ति काउं गहियाइं महग्घ-मोल्लाइं पंच महा-रयणाइं । ताइं जुण्ण-चेलंचले बंधिऊण कमेण पत्तो रण्णे । सो चिंतेइ, 'एत्थारण्णे णेगाओ चोर-पल्लीओ । कप्पडिओ वि वच्चंतो उग्गाविय-नग्गाविओ कीरइ । रूवगो वि गंठि-बद्धो न छुट्टइ ।'

तओ धणेसरो रयणाणि एगत्थ ठविऊण तेहिं समाइं पंच पत्थर-खंडाइं कच्छुट्टियाए गोविऊण, 'वंचेयव्वा मए तक्कर' त्ति निच्छिय-मणो, 'एस भो ! रयण-वणिओ गच्छइ' त्ति उच्च-सद्दं घोसंतो पविट्ठो महाडविं । घोसणाणंतरमेव गहिओ तक्करेहिं, पुच्छिओ य -

'कत्थ पत्थिओ सि ?'

'रयणाणि विक्केउं ।' तेण कहियं ।

'कत्थ ते रयणाणि ? दंसेहि' त्ति वुत्ते धणेसरेण कच्छुट्टियाओ कड्ढिऊण दंसिओ गंठी, भणियं च -

'महग्घाणि एयाणि, न तुब्भे गिण्हिउं तरहं ।' 'किमेएसिं मुल्लं' ति पुच्छिएण सिट्ठं - 'एगेगा धण-कोडी ।' तओ 'पत्थरे एए' त्ति जाणिऊण, 'नूणं गह-गहिओ एसो' त्ति कलिऊण भणिओ तेहिं । 'तुममेव एएसिं जोग्गो सि । गच्छ मणिच्छियं' ति ।

'जइ केइ गाहगा अन्ने वि जाणह ता सिग्घं पेसिज्जह ।' धणेसरेण भणियं । तओ हसिऊण पडि-नियत्ता चोरा । धणेसरो वि तं चेव घोसंतो चलिओ ।

अग्गओ पुणो वि अन्नेहिं चोरेहिं हक्कारिओ । ते वि तहेव 'गह-गहिओ' त्ति भणिऊण गया । एवं पए पए चोराणं दंसंतो पत्तो महा-कंतार-पारं । बीय-दिवसे तहेव घोसंतो पडिनियत्तो । तहेव 'गह-गहिओ' त्ति मुक्को य । तप्पभिइं दूरट्ठिया चेव चोरा निहालयंति जाव सत्तमे दिणे रयणाणि घेत्तूण गओ । सुहेण पत्तो सद्धाणं, भोगाणं च भागी संवुत्तो ।

टीप - प्राकृत साहित्यात अनेक प्रकारच्या धूर्तकथा व चातुर्यकथा येतात. शिवाजीमहाराजांनी पेटाऱ्यातून प्रथम मिठाई पाठवून नंतर जशी स्वत:ची सुटका करून घेऊन चातुर्य दाखवले, तशीच ही धनेश्वराची कथा आहे.

शब्दार्थ

धणेसर (धनेश्वर) पुं. श्रेष्ठीचे नाव
कालगए (कालगते) मरण पावल्यावर
नीय (नीच) वि. क्षुद्र, हलके
लज्जिज्जइ - लज्जित व्हावे लागते
आलोइऊण - 'आलोय' पू.का.धा.अ. विचार करून
न पयाणएहि दालिद्दं छिण्णइ - प्रवास करून दारिद्र्य फिटणार नाही
लहसि मासंते पइगोरूवयं रूवयं - प्रत्येक महिन्याच्या शेवटी प्रत्येक गुरामागे एक एक रुपया मिळेल
गोवालत्त (गोपालत्व) नपुं. गुराख्याचे काम
अहेसि - हो धातूचे अनियमित भूतकाळी रूप, होता
सहवड्ढिय (सहवर्धित) वि. बरोबर वाढलेले, सवंगडी
संठविऊण - 'संठव' पू.का.धा.अ. नीट व्यवस्था लावून
गामिल्ल (दे.) खेडूत
गोरूव (गोरूप) नपुं. गुरे वासरे
ववसायंतर - दुसरा व्यवसाय
मुत्तूण-'मुंच' - पू.का.धा.अ. सोडून
सत्थ (सार्थ) पुं. तांडा
संपया (सम्पदा) स्त्री. वैभव, धन

अभिद्दव (अभि+द्रु) क्रि. हल्ला करणे

ता न एसा संपया निव्वाहिउं तीरइ - तर हे वैभव असे (चोरांच्या तावडीतून) अरण्यपार करणे शक्य नाही

णेग (अनेक) वि. अनेक

उग्गाविअ-नग्गाविओ - वि. उघडा नागडा

वंचेयव्व (वञ्चयितव्य) विध्य. वि. फसवावे

कलिऊण - जाणून

गाहग (ग्राहक) पुं. गिऱ्हाईक

महाकंतारपार - मोठ्या अरण्यातून पलीकडे

महग्घमोल (महार्घमूल्य) वि. महागामोलाची

जुण्णचेलंचले - जुन्या वस्त्राच्या टोकात

कप्पडिय (कार्पटिक) पुं. भिकारी

कच्छुट्टिया (दे.) कासोटा, सोगा

गोविऊण - लपवून

गहगहिय (ग्रहगृहीत) वि. भुताने पछाडलेला

मणिच्छियं (मन+इष्ट) क्रि.वि.स्वच्छंदपणे

हक्कार (दे.) क्रि. हाकारणे

तप्पभिइं (तत्प्रभृति) अ. तेव्हापासून

निहाल (निभालय) क्रि. न्याहाळणे

भोगाणं च भागी संवुत्तो - विविध सुखोपभोगांचा भागिदार झाला

अभ्यास

१. **प्रश्नांची उत्तरे द्या -**

(१) धनेश्वराने देशांतराचा विचार का केला ?

(२) धनेश्वराने परदेशात कोणत्या प्रकारे संपत्ती मिळवली ? कोणत्या विचाराने तो स्वदेशास येण्यास निघाला ?

(३) धनेश्वर पाच बहुमोल रत्ने घेऊन कोणत्या युक्तीने महारण्यातील चोरांच्या तावडीतून सुटला ?

२. **रूपे ओळखा -** घोसंतो, तक्करेहिं, निहालयंति, मुत्तूण, दंसेहि

३. **या पाठातील सर्व पूर्वकालवाचक धातुसाधित अव्ययांचा संग्रह करा व त्यांचे अर्थ लिहा.**

४. **पुढील शब्दांना पाठात आलेले समानार्थी अर्धमागधी शब्द लिहा -**
धणं, वणं, तक्करो, विएसो, वत्थंचलं

५. **पुढील उताऱ्याचे भाषांतर करा -**
चंपाए दहिवाहणो राया । सो अईव कायव्व-परम्मुहो । न पेच्छइ सेण्णं । न संमाणेइ महा-सामंते । तओ तस्स सेवगा इओतओ गंतूण वित्ति-काले एव आगच्छंति । सामंता वि निय-निय-ठाणेसु रज्ज-सिरिं अणुहवंता चिट्ठंति । मंतिणो वि जाया उवेहापरा । पयाणं पुण्णेहिं रज्ज-सगडो चलइ ।
(कायव्वपरम्मुह-कर्तव्यविमुख, वित्तिकाल-पगाराची वेळ, रज्जसिरी-राजवैभव, उवेहापर-उपेक्षा करणारे, पया-प्रजा, रज्जसगड-राज्याचा गाडा)

व्याकरण-विवेचन - (८)

संधी

१. संधी या शब्दाचा मूळ अर्थ जोडणे, जोडणी, जुळणी असा होतो. सर्वच भाषांतून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात संधी प्रचलित असतात. पीतांबर (पीत+अंबर), महेश्वर (महा+ईश्वर), गंगोदक (गंगा+उदक), सूर्योदय (सूर्य+उदय) हे शब्द आपल्या इतके अंगवळणी पडले आहेत की ते संधी करून बनले आहेत ही गोष्ट सहजासहजी ध्यानात येत नाही.

२. अगोदरच्या शब्दाच्या शेवटी येणारा वर्ण आणि पुढील शब्दाच्या प्रारंभी असलेला वर्ण यापैकी एकात किंवा दोहोंतही जो बदल होतो त्यास संधी असे म्हणतात.

३. अर्धमागधीत बहुतेककरून संधी वैकल्पिक आहेत. संधिनियम हे साधारणपणे संस्कृतप्रमाणेच आहेत. तथापि अर्धमागधीत व्यंजनान्त शब्द आणि विसर्ग नसल्याने व्यंजनसंधी आणि विसर्गसंधी हे प्रकार नाहीत. मुख्यत्वेकरून स्वरसंधींचाच आपल्याला विचार करायचा आहे.

४. संस्कृतमधील शब्दांतर्गत व्यंजनाचा लोप होऊन जो स्वर राहतो त्याचा अर्धमागधीत संधी होत नाही. उदा- जइ (यति, यदि), रिउ

उदाहरणे -

(अ) (१) अ किंवा आ + अ किंवा आ = आ

जीव + अजीव = जीवाजीव

धम्म + अधम्म = धम्माधम्म

अ + अ (पुढे संयुक्त व्यंजन आल्यास) = अ

मरण + अंत = मरणंत

(२) इ किंवा ई + इ किंवा ई = ई

मुणि + ईसर = मुणीसर

इ + इ (पुढे संयुक्त व्यंजन आल्यास) = इ

मुणि + इंद = मुणिंद

(३) उ किंवा ऊ + उ किंवा ऊ = ऊ

साउ (स्वादु) + उदग = साऊदग

उ + उ (पुढे संयुक्त व्यंजन आल्यास) = उ

साहु + उत्त = साहुत्त

(ब) (१) अ किंवा आ + इ = ए

महा + इसि = महेसि

(२) अ किंवा आ + ई = ई

तियस + ईस = तियसीस

(३) अ किंवा आ + इ (पुढे संयुक्त व्यंजन आल्यास) = इ

देव + इंद = देविंद

महा + इड्ढि = महिड्ढि

(क) (१) अ किंवा आ + उ = ओ

महा + उयहि = महोयहि

(२) अ किंवा आ + ऊ = ऊ

महा + ऊसव = महूसव

(ड) (१) अ किंवा आ + ए = ए

इह + एव = इहेव

(२) अ किंवा आ + ओ = ओ

महा + ओसहि = महोसहि

(३) ए + ए = ए

से + एवं = सेवं

अभ्यास

१. **संधी करा -**

(१) पुहवी + ईसर (२) किच्च + अकिच्च (३) कइ + इंद (४) तहा + एव (५) गंगा + उदग

२. **संधी सोडवा -**

(१) सुरासुर (२) देविड्ढि (३) महेसि (४) धम्माणुभाव (५) एगिंदिय

१२. दुवालसमो पाढो
गयाणुगइओ लोगो

कम्मि वि नयरे एगो कुंभारो आसी । तस्स भज्जा भद्दा । तीए नरिंद-महिसीए सह मेत्ती-भावो आसी । बे वि परोप्पराण सुह-दुक्खाणं वत्तं सया एक्कमेक्काणं पुच्छंति । राय-महिसीए सहित्तणेण कुंभयारी भद्दा लोगाणं आयरं सम्माणं च पावेइ ।

कुंभगार-भज्जाए एगा गद्दही अईव वल्लहा आसी । गद्दहीए पुत्तो जायइ । सो अईव सेय-रूवो । तीए तस्सुवरिं बहु-नेहो अत्थि । तओ तस्स नामं मयणु त्ति दिण्णं ।

एगया पच्चूसे भद्दा महा-सद्देण रुवइ । राय-महिसीए दासी भद्दाए खेम-कुसलं पुच्छिउं आगया । सा पेच्छइ भद्दा रुवइ, कुंभयारो रुवइ, सयण-परियणा वि उच्च-सद्देहिं रोवंति । सा चिंतेइ, 'नूणं, इमीए गेहे को वि मओ, तेण सव्वे रुवंति ।'

तया सा दासी तत्तो सिग्घं निस्सरिऊण देविं कहेइ, 'भद्दाए गिहे को वि मओ ।' देवी कुंभगारीए गेहे गच्छइ । सा वि रुवंतीए तीए समीवे उवविसिऊण

रोविउं लग्गा। नरिंदो वि तत्थ महिसीए गमणं सोच्चा, सप्पहाणो तत्थ गओ। पच्छा सेणावई, कोट्टवालो, नयर-सेट्ठी जाव पउर-जणा वि गया। ते वि रोविउं लग्गा।

एत्थंतरम्मि एगो वइएसिगो समागओ। महंतं जण-समुदायं रुवंतं दट्ठूण सो एगं पुच्छइ, 'को एत्थ मओ ?' सो साहेइ, 'हं मित्तस्स पच्छा आगओ। मम मित्तो जाणइ।' सो मित्तं पुच्छइ, सो अन्नं दंसेइ। एवं कमेण एगेण पउर-जणेण कहियं, 'हं नयर-सेट्ठिणो पच्छा आगओ।' नयर-सेट्ठी कोट्टवालं, कोट्टवालो सेणावइं, सेणावई मंतिं दंसेइ। मंती वि कहेइ, 'नरिंदस्स पच्छा हं आगओ।' मंती नरिंदं पुच्छइ, 'एत्थ को मओ ?' नरिंदो कहेइ, 'अहं न-याणामि। अहं महिसीए पच्छा आगओ।' अंते महिसी भद्दाए समीवं गंतूण पुच्छइ, 'पिय-सहि, को तव गेहे अज्ज मओ ?' सा बोल्लेइ, 'मम गद्दही-पुत्तो मयणो नाम बाल-गद्दहो

अज्ज पच्चूसे मओ। सो बाल-गद्दहो मम बहु-वल्लहो आसी। तेणाहं रोवेमि।'
महिसी चित्ते चमक्किया, पच्छा हसिउं लग्गा।

एवं मयणस्स मच्चु-वत्तं नाऊण सव्वे विलक्खा जाया। परमत्थं नाऊण, तत्थ आगया सव्वे गयाणुगइया जणा एवं हसणीया जाया।

शब्दार्थ

गयाणुगइय (गतानुगतिक) वि. विचार न करता इतरांचे पाहून वागणारे
नरिंदमहिसी (नरेन्द्रमहिषी) स्त्री. राजाची पट्टराणी
गद्दही (गर्दभी) स्त्री. गाढवी
पच्चूस (प्रत्यूष) सकाळ
मय (मृत) क.भू.धा.वि. मरण पावलेला
उवविसिऊण - 'उवविस' - पू.का.धा.अ. बसून
वत्ता (वार्ता) स्त्री. बातचीत, वार्तालाप
सेयरूव (श्वेतरूप) वि. पांढऱ्या शुभ्र वर्णाचा
निस्सरिऊण-'**निस्सर**' - पू.का.धा.अ. निघून
चित्ते चमक्किया - मनात चमकली
परमत्थ (परमार्थ) वि. खरी गोष्ट
पहाण, सेणावई, कोट्टवाल, नगरसेट्ठी, पउरजण (राज्यातील विविध प्रकारचे लोक) प्रधान, सेनापती, कोतवाल, नगरश्रेष्ठी, पौरजन
वइएसिग (वैदेशिक) पुं. परदेशी पाहुणा
विलक्ख (विलक्ष) वि. लज्जित
हसणीया (हसनीय) विध्य.वि. हास्यास्पद

टीप - हा पाठ खास करून कर्म.भू.धा.वि. ची रूपे तसेच हेत्वर्थक, पू.का.धा.अ. व विध्यर्थक विशेषणांसाठी योजला आहे.

अभ्यास

१. **प्रश्नांची उत्तरे लिहा -**
(१) कुंभारीण लोकांच्या सन्मानास का पात्र ठरली होती ?
(२) मदन कोण होता ? तो कसा होता ?
(३) कुंभाराच्या घरी जमून कोण-कोण रडू लागले व का ?
(४) भद्रा कुंभारणीने राणीजवळ कोणता गौप्यस्फोट केला ?
(५) रडणारे सर्व लोक लज्जित कशामुळे झाले ?

२. (१) या पाठातील कर्म.भू.धा.वि. ची रूपे ओळखा.
(२) या पाठातील हे.धा.अव्यये एकत्रित करून लिहा.
(३) या पाठातील पू.का.धा. अव्ययांचा संग्रह करा.

३. पुढील मराठी शब्दांना अर्धमागधी प्रतिशब्द द्या –

आदर, स्नेह, श्रेष्ठी, प्रधान, कोतवाल, पौरजन, वल्लभ

□□□

व्याकरण-विवेचन - (९)

धातुसाधिते

धातूंना प्रत्यय लागून जेव्हा नवीन नामे, विशेषणे, अव्यये बनतात तेव्हा त्यांना धातुसाधिते असे म्हणतात. यापैकी कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषणे, हेत्वर्थक धातुसाधित अव्यये आणि पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यये यांचा या वर्षी विचार करावयाचा आहे.

कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषणे

१. इय हा प्रत्यय धातूला लागून ही कर्म.भू.धातुसाधित विशेषणे बनतात. उदा. पास - पासिय, धाव - धाविय, कह - कहिय. या खेरीज संस्कृतमध्ये जी कर्म.भू.धा.वि. विशिष्ट नियमांप्रमाणे किंवा अनियमितपणे बनतात; त्या वरून वर्णपरिवर्तनाच्या नियमांनुसार अर्धमागधीत अनेक प्रकारची कर्म.भू.धा.वि. आलेली आहेत. उदा –

धातू	संस्कृत रूप	अर्धमागधी रूप
पास	दृष्ट	दिट्ठ
गच्छ	गत	गय
लभ	लब्ध	लद्ध
जाण	ज्ञात	नाय
तर	तीर्ण	तिण्ण

२. कर्म.भू.धा.विशेषणे ही विशेषणे असल्यामुळे त्यांचे लिंग, वचन, विभक्ती विशेष्यांप्रमाणे असतात. या धातुसाधित विशेषणांचा उपयोग (१) विशेषणे म्हणून, तसेच (२) क्रियापदांच्या ऐवजी देखील करण्यात येतो.

(१) विशेषणे म्हणून उपयोग –

१. भागीरही **दूसिया** दीसइ । (गंगा दूषित झालेली दिसते.)

२. **संचियं** दव्वं । (साठविलेले धन)

३. **उवजुत्ता** अवयवा । (उपयुक्त अवयव)

४. **छिन्नाए** लयाए । (तोडलेल्या लतेने)

५. **लुद्धा** नरा नस्संति । (लोभी लोक नाश पावतात.)

(२) क्रियापद म्हणून उपयोग

(अ) सकर्मक धातू - येथे कर्मणी प्रयोगाची रचना करावी लागते. अशा वाक्यात कर्त्याची तृतीया, कर्माची प्रथमा आणि कर्म.भू.धा.वि. चे लिंग, वचन, विभक्ती कर्माप्रमाणे होतात. उदा -

१. तेण दव्वं भूमीए **ठवियं** । (त्याने धन जमिनीत ठेवले.)

२. विहिणा रुक्खा **निम्मिया** । (ब्रह्मदेवाने झाडे निर्माण केली.)

३. बालएण फलं **भक्खियं** । (मुलाने फळ खाल्ले.)

४. रामेण रावणो **हओ** । (रामाने रावणाला मारले.)

(ब) गत्यर्थक आणि अकर्मक धातू - अशा वाक्यात कर्ता प्रथमेत आणि भूतकालवाचक धा.वि.चे लिंग, वचन, विभक्ती कर्त्याप्रमाणे असतात. उदा -

१. वइएसिगो **समागओ** । (परदेशी इसम आला.)

२. तुमं **पसुत्तो** । (तू झोपी गेलास.)

३. फलं **पडियं** । (फळ पडले.)

४. नरवई नयरं **पविट्ठो** । (राजाने शहरात प्रवेश केला.)

५. नीला उज्जाणं **पत्ता** । (नीला बागेत आली.)

३. अर्धमागधीत भूतकाळाचा अर्थ व्यक्त करण्यासाठी या भूतकालवाचक धातुसाधित विशेषणांचा विपुल प्रमाणात उपयोग केला जातो. जीविय (जीवित) या सारख्या काही भू.का.वि.चा नामाप्रमाणेही उपयोग केला जातो.

हेत्वर्थक धातुसाधित अव्यये

१. एखादी मुख्य क्रिया करण्याच्या आधी गौण क्रिया केली असेल व दोन्ही क्रियांचा कर्ता एकच असेल तर मुख्य क्रिया दर्शविणाऱ्या धातूचे हेत्वर्थक धातुसाधित अव्यय वापरता येते.

(१) **दासी भद्दाए खेमकुसलं पुच्छइ ।**

(दासी भद्रेची ख्याली खुशाली विचारते.)

(२) **दासी आगया ।** (दासी आली.)

आता दोन्ही वाक्ये एकत्र करून असे म्हणता येईल की, 'भद्रेचे कुशल

विचारण्यासाठी दासी आली'. यात कुशल विचारणे ही मुख्य क्रिया असून त्यासाठी येणे ही गौण क्रिया केली आहे. या ठिकाणी पुच्छ (विचारणे) धातूचे हे.धा.अ. वापरता येईल.

भद्दाए खेमकुसलं **पुच्छिउं** दासी आगया ।

पुच्छिउं हे. धा.अ. आहे.

२. हे.धा.अ. दोन प्रकारांनी तयार होतात.

(१) **नियमित** (२) **संस्कृत** हे.धा.अ. म्हणजेच तुमन्तावरून वर्णपरिवर्तनाच्या नियमाने आलेली.

(१) नियमित - (अ) अकारान्त धातूंना **इउं** आणि इतर धातूंना **उं** प्रत्यय लावले जातात.

गच्छ - गच्छिउं, पास - पासिउं, गा - गाउं, हो - होउं, ठा - ठाउं

(ब) **सर्व धातूंना इत्तए किंवा एत्तए हे प्रत्यय लावले जातात.**

गच्छ - गच्छित्तए, गच्छेत्तए; **पास** - पासित्तए, पासेत्तए

(२) संस्कृत रूपांवरून आलेली हे.धा.अ.

लह - लद्धुं (लब्धुम्), **सुण - सोउं** (श्रोतुम्)

पास - दट्ठुं (द्रष्टुम्), **मुंच - मोत्तुं** (मोक्तुम्)

पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यये

१. एकच कर्ता जेव्हा एका मागून एक अनेक क्रिया करतो, तेव्हा सर्वात शेवटी केलेल्या क्रियेसाठी क्रियापदाचे त्या त्या काळाचे व अर्थाचे रूप वापरले जाते आणि अगोदरच्या क्रिया दाखवण्यासाठी पू.का.धा. अव्ययांचा उपयोग करता येतो.

उदा. -विद्यार्थी शाळेत **जाऊन** पाठाचे अध्ययन करतो.

छत्तो सालं **गंतूण** पाढं पढइ ।

२. पू.का.धा. अव्यये पुढीलप्रमाणे तयार करतात -

(१) नियमित - (अ) अकारान्त धातूंना **इऊण** प्रत्यय लावून आणि अन्य धातूंना **ऊण** प्रत्यय लावून -

उदा. - पास - पासिऊण, गा - गाऊण

(ब) सर्व धातूंना इत्ता, एत्ता, इत्ताणं, एत्ताणं, इत्तु, एत्तु हे प्रत्यय लावून -

उदा. - कर - करित्ता, करेत्ता, करित्ताणं, करेत्ताणं, करित्तु, करेत्तु

(२) **संस्कृतमधील पू.का.धा. अव्ययांमध्ये** (त्यांना त्वान्त व ल्यबन्त अव्यये असेही म्हणतात.) वर्णपरिवर्तनाच्या नियमांप्रमाणे बदल होऊन अर्धमागधीत या प्रकारची अव्यये येतात.

उदा. - **ओयरिय** (अवतीर्य) - उतरून

पणम्म (प्रणम्य) - नमस्कार करून

किच्चा (कृत्वा) - करून

सोच्चा (श्रुत्वा) - ऐकून

पेच्छिय (प्रेक्ष्य) - पाहून

अभ्यास

१. **रिकाम्या जागी कर्मणी भूतकालवाचक धातुसाधिताचे योग्य रूप लिहा -**

(१) सीहेण सियालो — । (भक्ख)

(२) जणणीए पुत्तस्स कहा — । (कह)

(३) तेण कन्नाओ — । (दिट्ठ)

(४) रयणं सायरमज्झम्मि — । (पड)

(५) रायउत्तो रायहाणिं — । (पविट्ठ)

२. **(अ) पुढील धातूंची हेत्वर्थक धातुसाधित अव्यये द्या -**

गच्छ, ने, हो, पास, सुण

(ब) पुढील धातूंची पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यये द्या -

गा, पास, चिंत, नम, जाण

३. **कंसात दिलेल्या सूचनांनुसार वाक्ये पूर्ण करा -**

(१) विस्सणाहो फलाइं —— वणं गच्छइ । (आहर-हे.धा.)

(२) छत्तो भोयणं —— सालं गच्छइ । (कर-पू.का.धा.)

(३) देवं —— भत्तो देउलं पविट्ठो । (नम-हे.धा.)

(४) रट्ठं —— वीरा जुज्झंति । (रक्ख-हे.धा.)

(५) दसरहं —— रामो वणं गओ । (पुच्छ-पू.का.धा.)

१३. तेरसमो पाढो
उज्जमसीलो किसीवलो

अह एगम्मि उडए निवसइ को वि किसीवलो। सययं उज्जम-सीलो सो ण कयावि अलसो ठाइत्था। गच्छंतेण कालेण वुड्ढत्तं आवण्णो सो उडय-समीवं एव किमवि किमवि करेंतो कालं गमेइ। एगम्मि दिणे नियड-वट्टिणा मग्गेण आगओ तप्पएसस्स निवई। तं अणुसरिंसु बे वि रायपुरिसा। आसरुहा सकोउयं पासिंसु पयाणं परिस्समस्स फलाणि। तमुडयं दट्ठूण सो भूवई कहित्था, 'अहो सच्छं सुरइयं चेव उडयं।'

पढमो रायपुरिसो : एवं एयं, महाराय ! अत्थ दीसंति फल-सहिया रुक्खा समीवट्ठा।

बीओ रायपुरिसो : देव ! पीणा एए पसुणो एत्थ चरंति। पासउ, महाराय ! सो वड्ढो किसीवलो इओ एव आगच्छइ। महारायं नमिऊण अंजलिं बंधेइ।

निवई : सत्थि तुब्भं, भो किसीवल। तुज्झ खेत्तं उडयं च दट्ठूणं अईव संतुट्ठो खु अहं। अहुणा तुमं किं करेसि ?

किसीवलो : अत्थ नूयणे अंब-रुक्खे आरोवेमि, महाराय !

निवई : रे थविर ! केत्तियं तुज्झ वयं ?

किसीवलो : चिरं जीवउ देव ! असीइ-वरिसाणि वइक्कंताणि मम जायस्स ।

निवई : हंत ! भो ! असीइ-वरिसिओ तुमं । साहु, जरढ, साहु ! धन्नो हं जं मम पया दिग्घाउं उवभुंजइ। अवरं च पुच्छामि, अस्स नवीणस्स अंबस्स फलाइं किं आसाएउं जीविस्ससि ?

किसीवलो : देव, निय-कायव्वं इइ करेमि। एयस्स अंबस्स आरोवणं न केवलं अप्पणो उवभोगत्थं । अहं चक्खेमि पुव्वएहिं आरोवियाणं तरूणं फलाणि । तहेव मए आरोवियस्स तरुणो फलाणि आसाइस्संति मे पुत्ता, पोत्ता, पपोत्ता य। एसेव लोयस्स परिवाडी।

निवई : रे बंधू, समीईणा खलु तुज्झ मणो-वित्ती । सुट्ठु सोहसि एएण सोहणेण कज्जेण। गिण्हसु तुज्झ कायव्व-बुद्धीए पारिओसियं। (इइ दस-सुवण्ण-मुद्दाओ देइ)

किसीवलो : (विणएण गिण्हिऊण) अहो किवालू गुणन्नू य भवं। अणुग्गहिओ म्हि। सुट्ठु कहियं केणावि महापुरिसेण जं।

उज्जमेण हि कज्जाणि सिज्झंति न मणोरहा ।
अओ सया हि कायव्वो अप्पमाएण उज्जमो ॥

शब्दार्थ

उडय (उटज) पुं.नपुं. झोपडी
वुड्ढत्तं आवण्णो - वाक्प्र. म्हातारपण आलेला
आसरुह (अश्वारोह) पुं. घोडेस्वार
पीण (पीन) वि. धष्टपुष्ट
आरोव (आरोपय) क्रि. लावणे
सुरइय (सुरचित) वि. व्यवस्थित
सत्थि (स्वस्ति) अ. क्षेमकुशल
उज्जमसील (उद्यमशील) वि.उद्योगी
गच्छंतेण कालेण - वाक्प्र. जसजसा काळ लोटत होता तसा
नियडवट्टि (निकटवर्तिन्) वि. जवळ असलेला
सकोउय (सकौतुक) क्रि.वि. कुतूहलाने
पया (प्रजा) स्त्री. प्रजा
कियं (कियत्) सर्व. किती ?

थविर (स्थविर) पुं. म्हातारा

असीइ (अशीति) संख्यावि. ऐंशी

जरढ (जरठ) संबो. वृद्धा !

किमट्ठं (किमर्थम्) कशासाठी

कायव्व (कर्तव्य) विध्य.वि.कर्तव्य

मणोवित्ति (मनोवृत्ति) स्त्री. मानसिक विचार

गुणन्नु (गुणज्ञ) वि. गुणाची कदर असणारा

वइक्कंत (व्यतिक्रान्त) वि.उलटली

साहु (साधु) उद्गारवाचक अ. छान, उत्तम

वयस्स (वयस्य) पुं. मित्र

परिवाडी (परिपाटी) स्त्री. रूढी, परंपरा

पोत्तपपोत्त (पौत्रप्रपौत्र) पुं.नातवंडे, पतवंडे

समीईण (समीचीन) वि. उत्तम, सात्त्विक

किवालु (कृपालु) वि. दयाळू

अणुग्गहिओ म्हि (अनुगृहीतोऽस्मि) वाक्प्र. मोठी कृपा झाली माझ्यावर, मी आभारी आहे.

अभ्यास

१. **प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) राजा व राजपुरुष यांनी शेतकऱ्याच्या बाबतीत कशाकशाचे निरीक्षण केले ?

(२) शेतकरी काय करत होता ?

(३) राजाने शेतकऱ्याला कोणता प्रश्न विचारला ?

(४) शेतकऱ्याने त्याचे कोणते सविस्तर उत्तर दिले ?

(५) राजाने कोणत्या शब्दांत शेतकऱ्याची स्तुती केली ?

(६) राजाने कोणते पारितोषिक दिले ?

(७) शेतकऱ्याने उद्योगशीलतेबद्दल काय सांगितले ?

२. **या पाठात आलेली पुढील भूतकाळी रूपे ओळखून त्यांचे व्याकरण लिहा -**
अणुसरिंसु, कहित्था

३. **नमिऊण, दट्ठूण, गिण्हिऊण, बंधिऊण या पूर्वकालवाचक धातुसाधित अव्ययांचे पाठातील उपयोगांचे निरीक्षण करा व त्याप्रमाणे पुढील वाक्ये बनवा. त्यांचे अर्थही लिहा.**

(१) जलं (पास) सो सरोवरस्स समीवं गच्छइ ।

(२) कूवाओ पाणियं (कड्ढ) सा रुक्खे सिंचइ ।

(३) पभूयं धणं (लह) वि सो सेट्ठी न तुस्सइ ।

(४) भत्तं (भुंज) छत्तो पाढसालं गओ ।

(५) पुप्फाइं (गेण्ह) सा पइदिणं देउलं गच्छइ ।

❑❑❑

१४. चोद्दसमो पाढो
चउ-जामायराणं कहा

कत्थ वि गामे एगो पुरोहिओ आसी। तस्स एगो पुत्तो, पंच य कन्नगाओ संति। तस्स चउरो कन्नगाओ विवाहियाओ। कयाई पंचमी-कन्नगाए विवाह-महूसवो पारद्धो। चउरो जामाउणो कन्नगाओ य आगया। पुण्णे विवाहे जामायरेहिं विणा सव्वे संबंधिणो निय-निय-घरेसु गया। जामायरा भोयण-लुद्धा गेहे गंतुं न इच्छंति। खज्ज-रस-लुद्धा ते परुप्परं चिंतंति, 'ससुर-गिह-निवासो सोहणो सव्व-लोए' एवं चिंतिऊण एगाए भित्तीए एसा सुत्ती लिहिया। सुत्तिं वाइऊण ससुरेण सयं तस्स हेट्ठा लिहियं,

'जइ वसइ विवेगी पंच छव्वा दिणाइं ॥
दहि-घय-गुड-लुद्धो मासमेगं वसेज्जा ।
स हवइ खर-तुल्लो माणवो माण-हीणो ॥'

ते जामायरा पायत्तिगं वाइऊणं पि गंतुं नेच्छंति । पुरोहिओ निय-भज्जाए सह किमवि वियारिऊण भोयण-विसए मंतणं करेइ । बीय-दिणे पुरोहिय-भज्जा भोयण-समए जामायराणं थूलं रोट्टगं घय-जुत्तं च देइ । तं दट्ठूण पढमो मणीरामो जामाया इयराणं कहेइ, 'अहुणा एत्थ वसणं न जुत्तं, निय-घरम्मि अओ वि साउ-भोयणं अत्थि ।' पच्चूसे ससुरं कहिऊण सो गओ । अण्णे तहेव ठिया ।

तयणंतरं पुरोहिय-भज्जा जामाऊणं तिल-तेल्ल-जुत्तं रोट्टगं देइ । तं दट्ठूण माहवो नाम जामायरो चिंतेइ, 'मम घरम्मि वि एयं लब्भइ, अओ कल्लं घरं गच्छामि ।' बीय-दिणे माहवो गच्छइ, परं तइय-चउत्थ-जामायरा न गच्छंति ।

पुरोहिओ भज्जाए कहेइ, 'पिए, रत्तीए ते बे वि आगच्छिस्संति, ताए वेलाए तए दुवारं न उग्घाडियव्वं ।' ते दोण्णि वि जामायरा संझा-समए गामे विलसिउं गया । विविह-कीलाओ कुणंता, नट्टाइं पेक्खंता, मज्झ-रत्तीए गेहमागया । पिहिय-दुवारं दट्ठूण समीवत्थियाए तुरंग-सालाए गया । भूमीए सुत्ता । पच्चूसे तइय-जामाउओ विजयरामो चिंतेइ, 'एत्थ सावमाणं ठाउं न उइयं ।' सो वि अप्पणो घरं गच्छइ । अहुणा केवलं केसवो जामायरो तत्थ ठिओ संतो गंतुं नेच्छइ ।

पुरोहिओ वि तस्स निक्कासणत्थं जुत्तिं विआरिऊण निय-पुत्तस्स कण्णे किंचि वि कहिऊण गओ । मज्झण्हे केसव-जामाओ भोयणत्थं उवविट्ठो । पुरोहिय-पुत्तो आगओ समाणो पुरोहिओ पुत्तं पुच्छइ, 'वच्छ ! एत्थ मए एगो रूवगो मुक्को, सो य केण गहिओ ?' सो कहेइ, 'अहं न जाणामि ।' पुरोहिओ बोल्लेइ, 'हे असच्च-वाइ ! पाव ! धिट्ठ ! देहि मे रूवगं अन्नह तं मारइस्सं ।' एवं कहिऊण सो उवाहणं गहिऊण मारिउं धाविओ । दोण्णि वि ते जुज्झमाणे दट्ठूण केसवो ताण मज्झे गंतूण, 'मा जुज्झह, मा जुज्झह' त्ति कहिऊण ठिओ । तया सो पुरोहिओ, 'हे जामायर ! अवसरसु अवसरसु' त्ति कहिऊण तं उवाहणेण पहरेइ । पुत्तो वि, 'केसव, दूरीभव दूरीभव !' त्ति कहिऊण मुट्ठीए तं केसवं पहरेइ । एवं ते बे वि केसवं ताडिंति । तओ सो तेहिं धक्का-मुक्केण ताडिज्जमाणो सिग्घं भग्गो ।

पुरोहियस्स परम-मित्तो पुरोहियं पुच्छइ, 'तए भोयण-रस-लुद्धा जामायरा घराओ कहं निक्कासिया ?' संखेवेण कहेइ,

'वज्ज-कूडा मणीरामो, तिल-तेल्लेण माहवो ।
भूसेज्जाए विजयरामो, धक्का-मुक्केण केसवो ॥

शब्दार्थ

कत्थवि - कोण्या एका

चउरो (चत्वार:) वि. चार

भोयणलुद्ध (भोजनलुब्ध) वि. हावरट, खादाडखाऊ

सुत्ति (सूक्ति) स्त्री. सुवचन

विवेगी (विवेकिन्) वि.विचारशील

पायत्तिग (पादत्रिक) नपुं. पद्यातील तीन ओळी

थूलं रोट्टगं - जाड रोटी

आगच्छिस्संति - भ.का. येतील

दोण्णि वि - दोघेही

पिहियदुवार (पिहितद्वार) नपुं. बंद दार

कन्नगा (कन्यका) स्त्री. मुलगी

संबंधि - नातेवाईक

खज्जरस (खाद्यरस) पुं. भोजनातील आस्वाद्यता

वाइऊण - वाचून

पंच छव्वा - पाच किंवा सहा

खरतुल्ल (खरतुल्य) वि. गाढवाप्रमाणे

मंतण (मन्त्रण) नपुं. विचार-विनिमय

पच्चूसे (प्रत्यूषे) सकाळी

उग्घाड (उद्घाट्य्) क्रि. उघडणे

नट्टाइं - नाटके

अवसर (अपसर) क्रि. दूर होणे

उइय (उचित) वि. योग्य
उवाहण (उपानह) स्त्री. वहाणा, जोडे
मा जुज्झह - आज्ञा. भांडू नका
धक्कामुक्केण - धक्काबुक्कीमुळे
निक्कासणत्थं (निष्कासनार्थम्) - बाहेर घालवण्यासाठी
तुरंगसाला (तुरङ्गशाला) स्त्री. अश्वशाळा, तबेला
वज्जकूडा - वज्रासारख्या कडक (व जाड चपात्यांनी मणीरामास घालवले)

अभ्यास

१. **प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) विवाहप्रसंगी पाहुणे आलेले चारही जावई सासुरवाडीस मुक्काम ठोकून का राहिले ?

(२) जावयांनी भिंतीवर कोणते सुवचन लिहिले ? सासऱ्याने कोणते तीन चरण लिहून ते सुवचन पूर्ण केले ?

(३) मणीराम, माधव, विजयराम हे तीन जावई कोणत्या युक्तीने आपापल्या घरी गेले ?

(४) कोणते नाटक रचून पुरोहित व त्याच्या पुत्राने चौथा जावई केशव यास घालवले ?

(५) पाठाच्या अखेरच्या श्लोकाचा अर्थ लिहा.

२. **जोड्या लावा.**

'अ' गट	'आ' गट
(१) ससुर-गिह-निवासो	(अ) मज्झरत्तीए गेहमागया ।
(२) ते दोण्णि वि जामायरा	(आ) विवाहमहूसवो पारद्धो ।
(३) एत्थ सावमाणं ठाइउं	(इ) अन्नह तं मारइस्सं ।
(४) कयाई पंचमी कन्नगाए	(ई) धक्कामुक्केण ताडिज्जमाणो भग्गो ।
(५) देहि ममं तं रूवगं	(उ) सोहणो सव्वलोए ।
(६) केसवो	(ऊ) न उइयं ।

३. **रूपे ओळखा -** कन्नगाओ, नियघरम्मि, कहिऊण, कुणंता, अहुणा

४. **उताऱ्याचे भाषांतर करा -**

एगा इत्थी एगस्स साहुस्स एगं मोयगं देइ । तीए पियसही तं पुच्छइ, 'किं तुमए सो मोयगो खाइओ न वा ?' सा कहेइ, 'हे मूढे ! सो लड्डुओ सुरहिगंधसंजुओ, सुरसो, चक्खणिज्जो आसी । किं तुमए, न खाइओ ?' सा भोयणलुद्धा इत्थी तस्स मुणिवरस्स पिट्ठओ धावंती गया ।

पज्ज-विभाओ

१. पढमो पाढो
सुहासियाइं

मा कस्स वि कुणसु निंदं, होज्जसु गुण-गेण्हणुज्जओ निययं
मा अप्पयं पसंससु, जइ वि जसं इच्छसे धवलं ॥१॥

जरा जाव न पीडेइ, वाही जाव न वड्ढइ ।
जाविंदिया न हायंति, ताव धम्मं समायरे ॥२॥

सक्का वण्ही निवारेउं वारिणा जलिओ बहिं ।
सव्वोयहि-जलेणावि मोहग्गी दुण्णिवारओ ॥३॥

पावं परस्स कुव्वंतो हसई मोह-मोहिओ ।
मच्छो गलं गसंतो वा विणिवायं न पासइ ॥४॥

उप्पण्णत्थे कज्जे अइ-चिंतंतो गुणागुणे तम्मि ।
चिर-याल-मंद-पेच्छित्तणेण पुरिसो हणइ कज्जं ॥५॥

अद्दंसणेण पुत्तय सुट्ठु वि नेहाणुबंध-घडियाइं ।
हत्थ-उड-पाणियाइं व कालेण गलंति पेम्माइं ॥६॥

सीहस्स कमे पडियं सारंगं जह न रक्खइ को वि ।
तह मिच्चुणा गहियं जीवं पि न रक्खइ को वि ॥७॥

मेरू गरिट्ठो जह पव्वयाणं, एरावणो सार-बलो गयाणं ।
सीहो बलिट्ठो जह सावयाणं, तहेव सीलं पवरं वयाणं ॥८॥

जा जाणइ समय-रसं सा जीहा सुंदरा हवइ लोए ।
दुव्वय-तिक्ख-धारा सेसा छुरिय व्व नव-घडिया ॥९॥

कीरंती विय नासइ उयए रेह व्व खलयणे मेत्ती ।
सा उण सुयणम्मि कया अणहा पाहाण-रेह व्व ॥१०॥

टीप – सुभाषित म्हणजे सुंदर वचन. प्राकृत वाङ्मयात अशी सुभाषिते भरपूर विखुरलेली दिसतात. सुभाषितांत कल्पना-सौंदर्य, विचार-सौंदर्य व शब्द-सौंदर्य यांचा उत्कृष्ट मिलाफ झालेला दिसतो. प्रस्तुत पाठात काही अर्धमागधी आगमातील व काही सुभाषित संग्रहातील अशी सुभाषिते वेचून घेतली आहेत. सुभाषितांतील कल्पना शब्दार्थात विशेष स्पष्ट करून सांगितल्या आहेत.

टीपा व शब्दार्थ

१. जर निष्कलंक कीर्तीची इच्छा करत असशील, तर कोणाची निंदा करू नकोस, नियमितपणे गुणग्रहणात तत्पर रहा व स्वत:ची स्तुती करू नकोस.

गुण+गेण्हण+उज्जय - गुणग्रहणात तत्पर
मा पसंससु - प्रशंसा करू नकोस
जस (यश) नपुं. कीर्ती
निययं (नियतं) क्रि.वि. नियमाने
अप्पयं (आत्मान) स्वत:ची
धवल (धवल) वि. शुभ्र, निष्कलंक

२. जोपर्यंत वृद्धत्व पीडा देत नाही, जोपर्यंत आजार वाढत नाही व जोपर्यंत इंद्रिये क्षीण होत नाहीत, तोपर्यंतच धर्माचरण करावे.

जाव-ताव (यावत्-तावत्) अ. जोपर्यंत-तोपर्यंत
वाहि (व्याधि) पुं. दुखणे, रोग
हायंति - क्रि.'हा'-क्षीण होतात
जरा (जरा) स्त्री. वृद्धत्व
जाव+इंदिया - जोपर्यंत इंद्रिये
समायरे - आचरण करावे

३. प्रज्वलित अग्नी बाहेरून पाणी मारून विझवणे शक्य आहे; परंतु सर्व समुद्राचे पाणी मारूनही मोहरूपी अग्नी विझवणे अशक्य आहे.

वण्हि (वह्नि) पुं. अग्नी
सव्वोयहि (सर्वोदधि) पुं. सर्व समुद्र
वारि (वारि) नपुं. पाणी
दुण्णिवार (दुर्निवार) वि. निवारण करण्यास कठीण

४. मोहाच्या आधीन झालेला, दुसऱ्यांशी पापाचरण करताना स्वत: हसत असतो (पण परिणामांची पर्वा करत नाही), मासा गळ गिळताना (आमिषाच्या लोभाने) स्वत:च्या नाशाचा विचार करत नाही.

मच्छ (मत्स्य) पुं. मासा
विणिवाय (विनिपात) पुं. नाश
गलं गसंतो - गळ (आमिष) गिळत असताना

५. कार्य अगदी पूर्ण होत आल्यावर त्यातील गुणावगुणांची चर्चा करणारा व दीर्घकाळ चिकित्सा करत राहणारा पुरुष, होत आलेल्या कामाची हानी करतो.

उप्पणणत्थ (उत्पन्नार्थ) पुं. कार्याची पूर्णता
तम्मि - त्यामधील
चिरयाल (चिरकाल) पुं. दीर्घकाळ
अइचिंतंतो - अतिशय विचार करणारा
मंदपेच्छित्तण - अतिचिकित्सा
हणइ - क्रि. नाश करतो

६. दृढ स्नेहबंधनांनी घडवलेली मैत्रीसुद्धा, हे पुत्रा, दीर्घकाळ दर्शन न झाल्यास, हाताच्या ओंजळीतून पाणी गळून जावे त्याप्रमाणे नाहीशी होते.

अद्दंसण (अदर्शन) नपुं. न दिसणे
सुट्ठु (सुष्ठु) अ. चांगली
हत्थउड (हस्तपुट) पुं. हातांची ओंजळ
पाणिय (पानीय) नपुं. पाणी
पुत्तय (पुत्रक) संबो. हे बाळा
नेहाणुबंध (स्नेहानुबन्ध) पुं.प्रेमाचे धागे
पेम्म (प्रेम) नपुं. प्रेम, मैत्री

७. सिंहाच्या टप्प्यातील हरणाचे कोणी रक्षण करू शकत नाही. तसेच मृत्यूने ग्रासलेल्या जीवाचेही कोणी रक्षण करू शकत नाही.

कमे (क्रमे) पायात (टप्प्यात) आलेला
गहिय (गृहीत) वि. पकडलेला
सारंग (सारङ्ग) पुं. हरीण
मिच्चुणा - मृत्यूने

८. जसा पर्वतांत मेरू विशाल, हत्तींमध्ये ऐरावत सामर्थ्यवान, श्वापदांत सिंह बलवान असतो, तसे सर्व व्रतात शील-व्रत महत्त्वाचे आहे.

गरिट्ठ (गरिष्ठ) वि. विशाल
एरावण (ऐरावत) पुं. इंद्राचा हत्ती
सावय (श्वापद) नपुं. पशू
पव्वय (पर्वत) पुं. पर्वत
सारबल - वि. अतिशय सामर्थ्यवान
पवर (प्रवर) वि. श्रेष्ठ

९. जी समयसूचकतेने बोलते (वेळाचे सार जाणते) अशी जीभच जगात सुंदर मानली जाते. परंतु दुर्वचनरूपी तीक्ष्ण धारेने युक्त अशी इतर जीभ नवीनच घडवलेल्या सुरीसारखी आहे (असे समजावे.)

समय-रस - वेळाचे भान, मर्म
तिक्खधारा (तीक्ष्णधारा) वि. तीक्ष्ण धारेने युक्त
छुरिया (क्षुरिका) स्त्री. सुरी
दुव्वय (दुर्वच) पुं. दुर्वचन
सेस (शेष) वि. इतर, बाकीची
नवघडिया (नवघटिता) वि.स्त्री. नवीनच घडवलेली

१०. दुष्टांशी केलेली मैत्री, पाण्यावरील रेघेप्रमाणे केल्याक्षणीच नाहीशी होते, तीच दोस्ती सज्जनांशी केली तर दगडावरील रेघेप्रमाणे (कायमची) निर्दोष होते.

कीरंती - करताक्षणी
नासइ (नश्यति) क्रि. नाहीशी होते
रेह व्व (रेखा इव) रेघेप्रमाणे
उण (पुन:) अ. मात्र
पाहाणरेहा (पाषाणरेखा) स्त्री. दगडावरील रेघ
विय (इव) अ. प्रमाणे
उयए - पाण्यात
खलयण (खलजन) पुं. दुष्ट लोक
अणह (अनघ) वि. पवित्र, निर्दोष

अभ्यास

१. **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) धवल कीर्ती कशाने मिळते ?
(२) धर्माचरण कोणी व कधी करावे ?
(३) दुसऱ्यांचे वाईट चिंतून हसणाऱ्या व्यक्तीला कशाची उपमा दिली आहे ?
(४) पुरुष कशामुळे कार्यहानी करून घेतो ?
(५) प्रेम कशामुळे कमी होते ? त्याला कशाची उपमा दिली आहे ?
(६) पर्वत, हत्ती, श्वापद व व्रते यांतील प्रत्येकात श्रेष्ठ कोणकोण आहेत ?
(७) कोणती जीभ सुंदर आहे ? कोणती सुरीप्रमाणे आहे ?
(८) जीव व मृत्यू यांना कोणत्या उपमा दिल्या आहेत ? का ?
(९) दुष्टांशी व सज्जनांशी केलेल्या मैत्रीत कोणता फरक आहे ?

२. **अर्धमागधी प्रतिशब्द द्या -**

प्रशंसा, यश, मोहाग्नि, हस्तपुट, मैत्री, पर्वत, मृत्यु, क्षुरिका, तीक्ष्ण, श्वापद, सारङ्ग, उदक

३. **पुढील वाक्यांचे मराठीत भाषांतर करा -**

(१) जिणो धम्मं भासइ ।
(२) पुरिसो खग्गं गेण्हइ ।
(३) रामो समरे बाणं मुंचइ ।
(४) अम्हे आइच्चं वंदामो ।
(५) मेहा जलं वरिसंति ।
(६) अम्हे हत्थे पाए य पक्खालेमो ।

२. बीओ पाढो
अरिट्ठणेमिणो निक्खमणं

अह ऊसिएण छत्तेण चामराहि य सोहिए ।
दसार-चक्केण य सो सव्वओ परिवारिओ ॥१॥
चउरंगिणीए सेणाए रइयाए जहक्कमं ।
तुरियाण सन्निणाएण दिव्वेण गगणं फुसे ॥२॥
अह सो तत्थ निज्जंतो दिस्स पाणे भयद्दुए ।
वाडेहिं पंजरेहिं च सन्निरुद्धे सुदुक्खिए ॥३॥
जीवियंतं तु संपत्ते मंसट्ठा भक्खियव्वए ।
पासित्ता से महा-पन्ने सारहिं इणमब्बवी ॥४॥
'कस्स अट्ठा इमे पाणा एए सव्वे सुहेसिणो ।
वाडेहिं पंजरेहिं च सन्निरुद्धा य अच्छहिं ?' ॥५॥
अह सारही तओ भणइ, 'एए भद्दा उ पाणिणो ।
तुज्झं विवाह-कज्जम्मि भोयावेउं बहुं जणं' ॥६॥
सोऊण तस्स वयणं बहु-पाणि-विणासणं ।
चिंतेइ से महा-पन्ने साणुक्कोसे जिए हिओ ॥७॥
'जइ मज्झ कारणा एए हम्मंति सुबहू जिया ।
न मे एयं तु निस्सेसं पर-लोगे भविस्सई' ॥८॥
सो कुंडलाण जुयलं सुत्तगं च महा-यसो ।



आभरणाणि य सव्वाणि सारहिस्स पणामए ॥९॥
देव-मणुस्स-परिवुडो सीया-रयणं तओ समारूढो ।
निक्खमिय बारगाओ रेवयम्मि ठिओ भगवं ॥१०॥
उज्जाणं संपत्तो ओइण्णो उत्तमाउ सीयाओ ।
साहस्सीइ परिवुडो अह निक्खमई उ चित्ताहिं ॥११॥
अह से सुगंध-गंधिए तुरियं मउ-कुंचिए ।
सयमेव लुंचई केसे पंच-मुट्ठीहिं समाहिओ ॥१२॥

टीप - जैन साहित्यात, जैन धर्माची प्रभावना (प्रसार) करणाऱ्या २४ तीर्थकरांच्या कथा अनेक ठिकाणी येतात. प्रस्तुत पाठ 'उत्तराध्ययन' या सुप्रसिद्ध जैन ग्रंथातून घेतला आहे. यात बाविसावे तीर्थंकर अरिष्टनेमी ऊर्फ नेमिनाथ यांना कोणत्या प्रसंगामुळे वैराग्यप्राप्ती झाली तो प्रसंग वर्णन केला आहे. हे अरिष्टनेमी कृष्णाचे चुलतबंधू होते. कृष्णाने त्यांचा विवाह 'राजीमती' नावाच्या राजकन्येशी ठरवला. तिच्या वडिलांनी विवाहासाठी सर्वांना त्यांच्या नगरात पाचारण केले. सर्व सैन्य व छत्रचामरांसहित अरिष्टनेमी निघाले. नगराजवळ त्यांना पिंजऱ्यात ठेवलेले पशु-पक्षी दिसले. त्यांनी त्यांविषयी सारथ्याकडे चौकशी केली. विवाहात मांसाहारी पाहुण्यांना मांसाहार देण्याची ती सामग्री होती. ते जिवंतपणी मरणदुःख भोगणारे पशुपक्षी बघून धार्मिक, दयाळू व विरक्त अशा अरिष्टनेमींचे अंतःकरण कळवळले. त्यांनी मनःपूर्वक दीक्षेचा निर्णय घेतला. सर्व आभूषणांचा त्याग केला. दीक्षेच्या पालखीत बसून ते रैवतक पर्वतावरील उद्यानात आले. दीक्षाविधीच्या वेळी त्यांनी मृदू, काळ्याभोर केसांचा पाच मुठींनी उपटून लोच (मुंडन) केला. हा कथाभाग या वेच्यात दिला आहे.

शब्दार्थ

ऊसिएण छत्तेण - उंचावलेल्या छत्राने
दसारचक्क - नपुं.-'दाशार्ह' राजांचा समूह
सन्निणाएण (सन्निनादेन) निनादाने, आवाजाने
निज्जंतो - नेले जात असताना
पाणे - प्राण्यांना
वाड - कुंपण
सन्निरुद्ध - वि. अडकवलेले
सोहिय (शोभित) वि. सुशोभित
रइयाए जहक्कमं - क्रमानुसार रचना केलेल्या (सैन्यासह)
तुरिय (तूर्य) नपुं. वाद्य, तुतारी
गगणं फुसे - आकाशास (जणू) स्पर्श केला
दिस्स (अनियमित रूप) पाहिले

सारहि - पुं. सारथी

भोयावेउं बहुं जणं - पुष्कळ लोकांना भोजन घालण्यासाठी

साणुक्कोस (सानुक्रोश) वि. दयाळू

जिए हिओ - जीवांविषयी हितकर भाव असणारे

जुयल (युगल) नपुं. जोडी

पणाम - क्रि.दे. देणे

सीयारयण (शिबिकारत्न) नपुं. उत्तम पालखी

बारगा (द्वारका) स्त्री. द्वारका

ओइण्ण (अवतीर्ण) वि. उतरले

तुरियं - त्वरित

मउकुंचिय - मऊ व कुरळे

लुंचई - उपटले, लोच केला

समाहिओ - शांत चित्ताने

सयमेव - स्वतःच

पंचमुट्ठीहिं - पाच मुठींनी

भयद्दुय - भीतिग्रस्त

पंजरेहिं - पिंजऱ्यांनी

अच्छहिं - आहेत

विवाहकज्जम्मि - विवाहकार्यात

सोऊण - ऐकून

बहुपाणिविणासण - पुष्कळ प्राण्यांचा विनाश असलेले

हम्मंति - ठार मारले जात आहेत

निस्सेसं - श्रेयस्कर, कल्याणप्रद

सुत्तग (सूत्रक) पुं. कडदोरा

परिवुड (परिवृत) वि. वेढलेला

निक्खमिय - निघून

रेवयम्मि - रैवतक पर्वतावर

साहस्सी - सहस्र व्यक्तींनी युक्त

चित्ताहिं निक्खमई - चित्रा नक्षत्रावर दीक्षा घेतली

अभ्यास

१. **प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) विवाहासाठी जाणाऱ्या अरिष्टनेमींचे वर्णन करा.

(२) अरिष्टनेमींनी कोणते दृश्य पाहिले ? सारथ्यास कोणता प्रश्न विचारला ?

(३) सारथ्याने अरिष्टनेमींना कोणते उत्तर दिले ?

(४) अरिष्टनेमींनी प्राण्यांविषयी कोणता विचार केला ? स्वतः कोणता निर्णय घेतला ?

(५) अरिष्टनेमींच्या दीक्षाविधीचे वर्णन करा.

२. **खालील शब्दांना समानार्थी शब्द पाठातून शोधून लिहा -**

उब्भिय, परिवेढिय, आगास, जीव, परिणय, दयालु, अलंकार, सुरहि

३. **या पाठातील पुढील अनियमित शब्दांचा शिक्षकांच्या मदतीने परिचय करून घ्या.**

फुसे, निज्जंतो, दिस्स, मंसट्ठा, अब्बवी, अच्छहिं, हम्मंति, भविस्सई, सीयारयणं, चित्ताहिं, लुंचई

३. तइओ पाढो
सिसुवाल-कहा

वसुदेव-सुसाए सुओ, दमघोस-णराहिवेण मद्दीए ।
जाओ चउब्भुओऽब्भुय-बल-कलिओ कलह-पत्तट्ठो ॥१॥
दट्ठूण तओ जणणी, चउब्भुयं पुत्तमब्भुयमणग्घं ।
भय-हरिस-विम्हय-मुही, पुच्छइ नेमित्तियं सहसा ॥२॥
नेमित्तिएण मुणिऊण, साहियं तीए हिट्ठ-हिययाए ।

जह एस तुब्भ पुत्तो, महा-बलो दुज्जओ समरे ॥३॥
एयस्स य जं दट्ठूण, होइ साभावियं भुया-जुयलं ।
होही तओ चिय भयं, सुयस्स ते नत्थि संदेहो ॥४॥
सा वि भय-वेविरंगी, पुत्तं दंसेइ जाव कण्हस्स ।
ताव च्चिय तस्स ठियं, पयइत्थं वर-भुया-जुयलं ॥५॥
तो कण्हस्स पिउच्छा, पुत्तं पाडेइ पाय-पीढम्मि ।
अवराह-खामणत्थं, सो वि सयं से खमिस्सामि ॥६॥
सिसुवालो वि हु जुव्वण-मएण नारायणं असब्भेहिं ।
वयणेहिं भणेइ सो वि हु, खमइ खमाए समत्थो वि ॥७॥
अवराह-सए पुण्णे, वारिज्जंतो ण चिट्ठई जाहे ।
कण्हेण तओ छिन्नं, चक्केणं उत्तमंगं से ॥८॥

टीप - शिशुपाल हा कृष्णाचा आतेभाऊ होता. त्याला जन्मत:च चार हात होते. त्याला बघून त्याची आई (माद्री) काळजीत पडली. तेव्हा तिने ज्योतिषाला विचारले. तो म्हणाला, 'ज्याने याला पाहिल्यावर याचे चारपैकी दोन हात गळून पडतील, त्याच्याकडून याला धोका आहे.' श्रीकृष्णाने त्याला पाहिल्यानंतर शिशुपालाचे चारपैकी दोन हात गळून पडले. माद्रीने श्रीकृष्णाला केलेली विनंती, श्रीकृष्णाने त्याच्या १०० अपराधांबद्दल केलेली क्षमा व अखेरीस सुदर्शनचक्राने केलेला शिरच्छेद हा सर्व वृत्तांत वरील पाठात आला आहे.

शब्दार्थ

सुसा (ष्वसा) स्त्री. बहीण
मद्दी (माद्री) स्त्री. वसुदेवाची बहीण माद्री
चउब्भुय (चतुर्भुज) वि. चार बाहूंनी युक्त
कलहपत्तट्ठ (कलहप्राप्तार्थं) वि. भांडखोर
पुत्तमब्भुयमणग्घं=पुत्तं+अब्भुयं+अणग्घं
नेमित्तिय (नैमित्तिक) पुं. लक्षण शास्त्र जाणणारा
अणग्घ (अनर्घ) वि. मौल्यवान (येथे, मोठ्या कौतुकाचा)
दमघोसणराहिव (दमघोषनराधिप) पुं. दमघोष राजा
अब्भुयबलकलिय (अद्‌भुतबलकलित) वि. अचाट सामर्थ्याने युक्त
भयहरिसविम्हयमुही (भयहर्षविस्मयमुखी) स्त्री.वि. भीती, आनंद व विस्मययुक्त मुख असलेली
हिट्ठ (हृष्ट) आनंदित

भुयाजुयल (भुजायुगल) नपुं. बाहूंची जोडी

भयवेविरंगी - वि. भयाने जिचे शरीर थरथर कापत आहे अशी

पिउच्छा (पितृष्वसा) स्त्री. आत्या

अवराहखामणत्थं (अपराधक्षमापनार्थम्) अपराधांच्या क्षमेसाठी

वि हु (अपि खलु) अ. जरी खरोखरच

जुव्वणमय (यौवनमद) पुं. तारुण्याची मस्ती

अवराहसए पुण्णे (अपराधशते पूर्णे) (सति सप्तमीची रचना), शंभर अपराध पूर्ण झाल्यावर

ण चिट्ठइ जाहे - जेव्हा (अपराध करण्याचा) थांबला नाही

होही - भ.का. होईल

पयइत्थ (प्रकृतिस्थ) वि. स्वाभाविक, नैसर्गिक

कण्ह (कृष्ण) पुं. कृष्ण

पायपीढ (पादपीठ) नपुं. पाय ठेवण्याचा चौरंग

सो वि सयं से खमिस्सामि - तो (कृष्ण) म्हणाला यांच्या शंभर अपराधांना मी क्षमा करीन

नारायण - कृष्ण

वारिज्जंत - अडवून किंवा मनाई करून सुद्धा

उत्तमंग (उत्तमाङ्ग) नपुं. मस्तक

अभ्यास

१. **या उताऱ्यातील शिशुपालकथा आपल्या शब्दात लिहा.**

२. **जोड्या लावा -**

'अ' गट	'आ' गट
(१) द्वितीया	(अ) मुणिऊण, दट्ठूण
(२) तृतीया	(आ) नेमित्तियं, नारायणं
(३) पंचमी	(इ) पायपीढम्मि
(४) षष्ठी	(ई) ठियं, छिन्नं
(५) सप्तमी	(उ) एयस्स, कण्हस्स
(६) कर्म.भू.धा.वि.	(ऊ) तओ
(७) पू.का.धा.अ.	(ऋ) हिट्ठहिययाए, जुव्वणमएणं, वयणेहिं

३. **पुढील श्लोकाचे भाषांतर करा -**

पासपरिसंठिओ वि हु गुणहीणे किं करेइ गुणवंतो ।
जायंधयस्स दीवो हत्थकओ निप्फलो च्चेय ॥

(पासपरिसंठिओ-जवळ असलेला, जायंधय-जन्मान्ध)

हद्या श्लोकातील कल्पना कथेच्या संदर्भात स्पष्ट करा.

४. चउत्थो पाढो
सुहासियाइं

तं नमह भारइं जीए, चरण-नह-दप्पणेसु संकंता ।
बहु-वयणा होंति फुडं, पणमंता तक्खणे कइणो ॥१॥
छंदं अयाणमाणेहिं जा कया सा न होइ रमणीया ।
किं गाहा न हु सेवा ? अहवा गाहा वि सेवा वि ॥२॥
चिंता-मंदर-मंथाण-मंथिए वित्थियम्मि अत्थाहे ।
उप्पज्जंति कइ-हियय-सायरे कव्व-रयणाइं ॥३॥
सुयणत्तणं न केणवि अंतो-मलिणाण तीरए काउं ।
सीसेण वहंतस्स पि हरस्स वंको च्चिय मयंको ॥४॥
दीसंति जोय-सिद्धा अंजण-सिद्धा तहेव दीसंति ।
दालिद्द-जोय-सिद्धा पासे ठिया न दीसंति ॥५॥
अंबय-फलं सुपक्कं कुहियं बिंटं समुद्धओ वाओ ।
साहा डोल्लण-सीला न-याणिमो कत्थ परिणामो ॥६॥
नमिऊण जं विढप्पइ खल-चलणं तिहुयणं पि किं तेण ।
माणेण जं विढप्पइ तणं पि तं निव्वुइं कुणइ ॥७॥
विहि-विहियं चिय लब्भइ अमयं देवाण महु-महे लच्छी ।
रयणायरम्मि महिए हरस्स भाए विसं जायं ॥८॥
तं नत्थि घरं तं नत्थि देउलं राउलं पि तं नत्थि ।
जत्थ अकारण-कुविया दो तिन्नि खला न दीसंति ॥९॥
लवण-समो नत्थि रसो विन्नाण-समो य बंधवो नत्थि ।
धम्म-समो नत्थि निही कोह-समो वेरिओ नत्थि ॥१०॥

टीप – प्राकृत भाषेत अनेक उत्तमोत्तम सुभाषितांचे संग्रह आहेत. 'गाहा-रयण-कोस' (गाथारूपी रत्नांचा खजिना) हा त्यातीलच एक आहे. मुनी धनेश्वरांच्या या सुभाषित-

संग्रहातून विविध विषयांवर आधारित अशी सुभाषिते या पाठात निवडली आहेत. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुभाषित-संकल्पना स्पष्ट करून सांगितली आहे.

शब्दार्थ व टीपा

१. वाग्देवता सरस्वतीला वंदन असो (वंदन करा). अशी वाग्देवता, जिच्या पद-नखरूपी दर्पणात (आरशात), वंदन करणारे कवी तत्काळ स्पष्टपणे 'बहु-वयण' वाग्विलासाने युक्त (आरशात प्रतिबिंबित चेहेऱ्याचे) होतात.

नमह (नमत) आज्ञा. वंदन करा

जीए - सर्व. जिच्या

चरणनहदप्पण (चरणनखदर्पण) पुं. पायाचा नखरूपी आरसा

फुडं (स्फुटं) क्रि.वि. नक्कीच स्पष्टपणे

तक्खण (तत्क्षण) त्याच क्षणी, तत्काळ

भारई (भारती) स्त्री. वाग्देवता, सरस्वती

संकंत (सङ्क्रान्त) वि. प्रतिबिंबित

बहुवयण (बहुवचन/बहुवदन) वि. पुष्कळ वाणीने युक्त (पुष्कळ मुखांनी युक्त)

२. छंद (१. काव्यातील छंद २. मनोगत भाव) न जाणता जी केली जाते ती सुंदर वाटत नाही अशी कोण ? गाथा की सेवा ? अथवा गाथा आणि सेवासुद्धा.

अयाणमाण - न जाणणारे

गाथा (श्लोक) व सेवा यातील साम्य दाखवले आहे. भावहीन काव्य व सेवा रमणीय नसतेच.

३. चिंतनरूपी मंदर पर्वताच्या रवीने घुसळलेल्या विस्तृत कवि-हृदय-रूपी अथांग सागरातूनच काव्यरूपी रत्ने निर्माण होतात.

चिंता (चिन्ता) स्त्री. चिंतन, मनन

मंथाण - रवी

अत्थाह (अस्ताघ) वि. अथांग

कइहिययसायर (कविहृदयसागर) कवीचे हृदयरूपी सागर

मंदर (मन्दर) पुं. मंदर पर्वत

वित्थिय (विस्तृत) वि. विशाल

उप्पज्जंति (उत्पद्यन्ते) उपजतात

४. अंत:करणाने मलिन असलेल्यांना भले बनवणे कोणालाही असंभव आहे. शंकराने मस्तकावर धारण करूनही चंद्राचे वक्रत्व (कुटिलत्व) तसेच राहिले.

सुयणत्तण (सुजनत्व) नपुं. सज्जनपणा

न तीरए काउं - वाक्प्र. करणे शक्य नाही

हर - शंकर

मयंक (मृगाङ्क) पुं. चंद्र

अंतोमलिन - वि. अंत:करणाने मलिन असलेले

सीसेण वहंत - मस्तकावर धारण केलेला

वंक (वक्र) वि. कुटिल

५. योगसिद्धी प्राप्त केलेले, तसेच अंजन-सिद्धी प्राप्त केलेलेही दिसतात;

पण दारिद्र्याच्या योगाने सिद्धी प्राप्त केलेले जवळ असूनही (इतरांना) दिसत नाहीत.

दीसंति - कर्मणि रूप, दिसून येतात

अंजणसिद्ध (अंजनसिद्ध) डोळ्यांत अंजन घालून अद्‌भुत शक्ती मिळवलेले

जोय-सिद्ध (योगसिद्ध) पुं. योगाने सिद्धी मिळवलेले

दालिद्दजोयसिद्धा न दीसंति - दारिद्र्यामुळे माणसाची किंमत व्यावहारिक जगात इतकी कमी होते की असे लोक जवळ असूनही इतर त्यांची दखल घेत नाहीत.

६. आम्रफल पिकलेले आहे, देठ कुजलेला आहे, वारा वेगाने सुटला आहे, फांदी डुलत आहे, केव्हा परिणाम (आंब्याचे पडणे) होईल ते सांगता येत नाही. (भावार्थ-कार्य होण्यास आवश्यक सर्व घटक जुळून आले तरी योग्य वेळ आल्यावरच ते परिणाम दाखवते.)

अंबयफल (आम्रकफल) नपुं. आंबा

कुहिय (कुथित) वि. कुजलेले

डोल्लणसील - वि. डोलणारी

सुपक्क (सुपक्व) वि.चांगले पिकलेले

बिंट (वृन्त) नपुं. देठ

समुद्धय (समुद्धत) वि. फोफावलेला, वेगाने सुटलेला

७. दुष्ट (दुराचरणी) व्यक्तींचे पाय धरून त्रिभुवन जरी जिंकले तरी त्याचा काय उपयोग ? सन्मानाने गवताचे पाते जरी मिळवले तरी ते समाधान देते.

विढप्प (क्रि.) दे. प्राप्त करणे, मिळवणे

तिहुयण (त्रिभुवन) नपुं. त्रिभुवन, त्रैलोक्य

खलचलण (खलचरण) दुर्जनांचे पाय

तण (तृण) नपुं. गवत, तण

निव्वुइ (निर्वृति) स्त्री. समाधान, सुख

८. दैवात जे योजलेले असते तेच मिळते. समुद्रमंथन केल्यावर देवांना अमृत, विष्णूला लक्ष्मी मिळाली; पण (दुर्दैवी) शंकराच्या वाट्याला मात्र विषच आले.

विहिविहिय (विधिविहित) वि विधात्याने, नशिबाने दिलेले

अमय (अमृत) नपुं. अमृत

महिय (मथित) वि. घुसळलेला

लब्भइ - क्रि. लाभते

महुमह (मधुमथ) पुं. विष्णू

भाए (भागे) नशिबात

९. असे एकही घर, देऊळ किंवा राजकुल नाही जेथे अकारणच रागावणारे (दुष्टपणा करणारे) दोन-तीन दुष्ट लोक दिसून येत नाहीत.

देउल (देव-कुल) नपुं. देऊळ

राउल (राजकुल) राजकुल

अकारणकुविय (अकारणकुपित) वि. उगीचच रागावणारे

१०. मिठासारखी चव नाही, विद्येसारखा बंधू नाही, धर्मासारखा खजिना नाही, क्रोधासमान शत्रू नाही.

लवण (लवण) नपुं. मीठ, खारटपणा

विन्नाण (विज्ञान) नपुं. विद्या

अभ्यास

१. **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा -**

(१) सरस्वतीच्या वंदनाने काय साधते ?

(२) गाथा व सेवा यात कोणते साम्य आहे ?

(३) काव्यनिर्मिती व समुद्रमंथन यात कोणते साम्य आहे ?

(४) वक्र चंद्रकोरीवरून कवी कोणता सिद्धांत मांडतो ?

(५) दरिद्री माणसांची कोणती अवस्था असते ?

(६) आंब्याची कोणती स्थिती वर्णिली आहे ? कवीला त्यावरून काय सूचित करायचे आहे ?

(७) कोणते वैभव समाधान देते ?

(८) 'नशिबात असेल तेवढेच मिळते', त्यासाठी कवी कोणता दृष्टांत देतो ?

(९) मीठ, विद्या, धर्म व क्रोध यांची कशाशी तुलना केली आहे ?

२. **पुढील पाठ्येतर सुभाषितांतील कल्पना स्पष्ट करा -**

(१) अन्नं धरंति हियए अन्नं वायाइ कीरए अन्नं ।
छेयाण पत्थिवाण य खलाण मग्गो च्चिय अउव्वो ॥

(२) कज्जं फलं व सरसं जायइ निय-काल-परिणई-पडियं ।
तमकाले घिप्पंतं दुहावहं होइ विरसं च ॥

परिशिष्ट - १ (अ)

विभक्तिप्रत्यय

(अकारान्त पुंलिंग)

विभक्ती	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	ओ-ए	आ
द्वितीया	ं (म्)	ए-आ
तृतीया	ण-णं	हि-हिं
पंचमी	ओ-आ	हिंतो
षष्ठी	स्स	ण-णं
सप्तमी	ए-अंसि-अम्मि	सु-सुं
संबोधन	-	आ

(अकारान्त नपुंसकलिंग)

विभक्ती	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	ं (म्)	इं-णि
द्वितीया	--,,--	--,,--
संबोधन	-	इं-णि

इतर सर्व प्रत्यय अकारान्त पुंलिंगाप्रमाणे आहेत.

(सर्वप्रकारच्या स्त्रीलिंगी नामांना व विशेषणांना लागणारे विभक्तिप्रत्यय)

विभक्ती	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	-	-, ओ
द्वितीया	ं (म्)	-, ओ
तृतीया	ए	हि, हिं
पंचमी	ए, ओ	हिंतो
षष्ठी	ए	ण, णं
सप्तमी	ए	सु, सुं
संबोधन	-, ए	-, ओ

टीप - इकारान्त व उकारान्त स्त्रीलिंगी शब्दांची सप्तमी एकवचनाची वैकल्पिक रूपे भूमिंसि, धेणुंसि अशीही होतात.

विभक्तिप्रत्यय

(इकारान्त व उकारान्त पुंलिंग)

विभक्ती	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	-	-, णो, ओ
द्वितीया	ं (म्)	-, णो, ओ
तृतीया	णा	हि, हिं
पंचमी	णो, ओ	हिंतो
षष्ठी	णो, स्स	ण, णं
सप्तमी	अंसि, अम्मि	सु, सुं
संबोधन	-	-, णो, ओ

(इकारान्त व उकारान्त नपुंसकलिंग)

विभक्ती	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	ं (म्)	इं, णि
द्वितीया	--,,--	--,,--
संबोधन	-	इं, णि

परिशिष्ट - १ (ब)

धातूंना लागणारे प्रत्यय

वर्तमानकाळ

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पु.	मि	मो
द्वितीय पु.	सि	ह
तृतीय पु.	इ	अंति

भूतकाळ

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पु.	इत्था	इंसु
द्वितीय पु.	--,,--	--,,--
तृतीय पु.	--,,--	--,,--

आज्ञार्थ

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पु.	मु	मो
द्वितीय पु.	-, सु, हि	ह
तृतीय पु.	उ	अंतु

परिशिष्ट - २

विशिष्ट विभक्तींचा उपयोग

१. ज्या ठिकाणी जावयाचे असेल त्या शब्दाची द्वितीया किंवा क्वचित् सप्तमी वापरतात.

अहं **उज्जाणं** / **उज्जाणे** गच्छामि ।

२. सह, समं, सद्धिं (सर्वांचा अर्थ समवेत, बरोबर) या अव्ययांना तृतीयेची अपेक्षा असते.

रामेण सह / समं / सद्धिं सीया वणं गया ।

३. विणा (शिवाय, खेरीज) या अव्ययाला तृतीयेची अपेक्षा असते.

पुत्तेण विणा जणणी सुहं न लहइ ।

४. किं (काय उपयोग) या शब्दाचा अव्ययाप्रमाणे उपयोग केला असता त्यास तृतीयेची अपेक्षा असते

अंधस्स **दप्पणेण** किं ?

५. अलं (पुरे) या अव्ययाला तृतीया लागते.

अलं **रोयणेण** । अलं बहु **जंपिएण** ।

६. संजाय किंवा जाय (उत्पन्न होणे) - ज्यापासून उत्पन्न व्हायचे त्याची पंचमी वापरतात.

कामा कोहो संजायइ / जायइ ।

७. ज्याच्या विषयी भीती, विरक्ती, उद्वेग, परावृत्त होण्याची किंवा थांबण्याची क्रिया दाखवावयाची असेल त्याची पंचमी वापरतात.

नरस्स **मरणाओ** भयं अत्थि ।

मा बीहसु **मरणाओ** ।

उव्विग्गो / नियत्तो **संसाराओ** ।

विरम **साहसाओ** ।

८. आ (पासून, पर्यंत) या अव्ययाला पंचमी लागते.

आ **मूलाओ** कहं सोउं इच्छामि ।

९. दोन वस्तूंतील तुलना पंचमीने दाखवितात.

दक्खाफलाओ अंबफलं अहियं महुरं ।

१०. उवरि (वर), हेट्ठा (खाली), कए (साठी), समीवं-समीवे (जवळ), पच्छा (मागाहून), नमो (नमस्कार असो), सत्थि (कल्याण असो), धी (धिक्कार असो) या आणि त्या अर्थाच्या इतर अव्ययांना षष्ठीची अपेक्षा असते.

पायवस्स उवरि पक्खी वट्टइ ।

पायवस्स हेट्ठा बालओ चिट्ठइ ।

निवस्स कए सेणावई पाणे चयइ ।

पायवस्स समीवं-समीवे वावी अत्थि ।

जणयस्स पच्छा पुत्तो गच्छइ ।

नमो **आयरियाणं** ।

सत्थि **पयाणं** ।

धी धी **कयग्घस्स नरस्स** । धिरत्थु **पावपुरिसाणं** ।

११. अनेकांशी तुलना करताना षष्ठी किंवा सप्तमी वापरतात.

सव्वासिं नईणं / **सव्वासु नईसु** भागीरही अईव पवित्ता ।

परिशिष्ट - ३

देशी शब्दांचा संग्रह

अर्धमागधी (प्राकृत) मधील सर्व शब्दसंपत्ती तत्सम, तद्भव व देशी अशा प्रकारे विभागण्यात येते. त्या विषयीची विस्तृत माहिती व्याकरण विवेचन-१ मध्ये दिली आहे. देशी शब्दांचा उगम आपल्याला संस्कृत शब्दांमध्ये शोधता येत नाही. त्यांचा संबंध विविध प्रांतांतील बोली भाषांशी आहे.

नामे

अक्का - बहीण, अका
अग्घाड - आघाडा
अत्ता - आत्या
आराडी - आरडाओरडा
उक्कुरुड - उकिरडा
उज्जड - उजाड
उत्थलपत्थल - उलथापालथा
उंदुर - उंदीर
कुड्ड - कोड (कौतुक), लाड
कुल्ह - कोल्हा
कोइला - कोळसा हिं. कोयला
खडक्की - खिडकी
गड्डी - गाडी
घोसाली - घोसाळे
चाउल - तांदूळ हिं. चावल
छल्लि - साल हिं. छिलका
जोवारी - ज्वारी, जोंधळी
झडी - वर्षाव, झड हिं. झडी
टोल - टोळ
डोलो - डोळा
ढंकुण - ढेकूण
तल्ल - तळे
दवर - दोरा
पत्तल - पातळ, धारदार
फुक्का - फुकट
बाउल्ली - बाहुली
मंगुस - मुंगुस
वंग - वांगे
सूरण - सुरण (कंद)
हलबोल - गडबड-गोंधळ

क्रियापदे

अट्ट - आटणे
कढ - कढणे
घुट्ट - घोट घेणे
घुसल - घुसळणे
घोल - घोळणे
छज्ज - शोभणे, साजणे
छुप्प - लपणे हिं. छिपना
झड - झडणे
सिंप - शिंपडणे
झूर - झुरणे
पज्झर - पाझरणे
पट्ठव - पाठवणे
पोक्कर - पुकारणे हिं. पुकारना
फिट्ट - फिटणे
बुड्ड - बुडणे हिं. डूबना
भुक्क - भुंकणे
भुल्ल - चुकणे, विसरणे हिं. भूलना



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

रु. १.९०